वर्ष : सतरावे
एप्रिल २०२५
अंक : चौथा
मूल्य १० रुपये
पृष्ठसंख्या ५६

# राजहंस ग्रंथवेध

ग्रंथप्रेमींच्या स्नेहसंवादासाठी
'राजहंस' प्रकाशनाचे व्यासपीठ

मृत्यू समीप असतानाही जगावेगळा विचार करणाऱ्या
व्यक्तींच्या या आहेत असामान्य जीवनस्पर्शी आणि वास्तवदर्शी कथा...
यांतील प्रसंग, गूढता, ताणतणाव आणि दिलासा देणारा हळुवार स्पर्श
वाचकांना मनभावन होईल.



लवकरच येत आहे...

हे पुस्तक आहे.....
सुमारे साडेचार अब्ज वर्षांपूर्वी
निर्माण झालेल्या पृथ्वीच्या अंतरंगाविषयीचं !
तिच्या आजतागायत सुरू असलेल्या बदलांच्या आणि
त्याला कारणीभूत असलेल्या घटकांच्या
रंजक आणि सुबोध पद्धतीने केलेली शास्त्रीय मांडणीचं....!
तेव्हा जरूर वाचा...



ग्रंथप्रेमींच्या स्नेहसंवादासाठी 'राजहंस' प्रकाशनाचे व्यासपीठ

*आम्हा घरी धन शब्दांचीच रत्ने । शब्दांचीच शस्त्रे यत्ने करू ॥*
*शब्दचि आमुच्या जीवाचे जीवन । शब्दे वाटू धन जनलोकां ॥*

**संत तुकाराम**

# राजहंस ग्रंथवेध

संपादक :
डॉ. सदानंद बोरसे

सल्लागार संपादक :
विनया खडपेकर

कार्यकारी संपादक :
डॉ. प्रिया निघोजकर

संपादन साहाय्य :
विनायक पणशीकर
नरेश सबजीवाले
शुभांगी देशपांडे
डॉ. उमेश करंबेळकर
पंकज क्षेमकल्याणी
आरती घारे

मुखपृष्ठ शीर्षकरचना :
बाबू उडुपी

बोधचित्रे :
राहुल देशपांडे

मुखपृष्ठ :
तृप्ती देशपांडे

अक्षरजुळणी :
यशोधन लोवलेकर

वर्ष सतरावे :
अंक चौथा
१५ एप्रिल २०२५
मूल्य : ₹ १०/-

अनुक्रम :

- संपादकीय / ५
- राजहंसी विशेष
  - *अनुवाद आणि मी* - शिरीष सहस्रबुद्धे / ९
  - *'जागतिक पुस्तक दिन' विशेष*
  - माधव वझे / १२
- राजहंसी ग्रंथसृष्टी
  - *ऐवज विचारांचा* - हर्ष अनिरुद्ध जोशी / १७
- वसा अक्षर चळवळीचा
  - *आम्ही (सातारकर) पुस्तकप्रेमी समूह*
  - डॉ. संदीप गजानन श्रोत्री / २३
- अभिजात मराठीची अक्षरप्रभा / २७
- असे जन्मले पुस्तक!
  *हिंदुत्व, मार्क्सवाद आणि भारत*
  - विजय आपटे / ३१
- आठवणींचा पारिजात
  - *शल्य हे सलते उरी!* - श्रीराम रानडे / ३५
- क... कवितेचा - हेमकिरण पत्की / ३९
- उद्‌गार -
  *ओंजळीतील चाफा* - मुकेश थळी / ४१
  *पाकिस्तानचा अर्थ तरी काय?*
  - अरविंद व्यं. गोखले / ४३
- राजहंसी पार / ४७
- वाचकांच्या मनातलं... / ५१

या अंकातील लेखांमधील मते ही त्या त्या लेखकांची असून त्यांच्याशी संपादक सहमत असतीलच, असे नाही.

पत्रव्यवहाराचा पत्ता : **राजहंस ग्रंथवेध, द्वारा राजहंस प्रकाशन**
१०२५ सदाशिव पेठ, पुणे ४११०३०. फोन - (०२०) २४४७३४५९
संपादक विभाग - ७४९८७११९३०.
E-mail : rajhansgranthvedh@gmail. com ● Website : www. rajhansprakashan. com

## वाचकांच्या अंगणात नव्याने उतरलेली 'राजहंसी' पुस्तके



बुद्धिबळाच्या विविध वैशिष्ट्यांचा... या खेळाच्या इतिहासातील अज्ञात वळणांचा... खेळाडूंच्या कर्तृत्वाचा... आणि चित्रपटातून दिसलेल्या बुद्धिबळ क्षेत्राचा मागोवा घेत बुद्धिबळ जगताची रोचक सफर घडवणारे पुस्तक.

### ६४ घरांच्या गोष्टी

रघुनंदन गोखले

किंमत : ₹ ४७५/- । (ट.ख. ₹ ५०)




'लैंगिकता' या मानवी नात्यांतील मूलभूत पैलूविषयी शास्त्रीय पद्धतीनं भाष्य करत, उत्तम सहजीवनाचा मूलमंत्र देणारं, ज्येष्ठांच्या सहजीवनाचं महत्त्व अधोरेखित करणारं एक आगळंवेगळं पुस्तक.

### देहभान
लैंगिकतेविषयी जाणून घेऊ या...

निरंजन मेढेकर

किंमत : ₹ २५०/- । (ट.ख. ₹ ५०)




खास छोट्या दोस्तांसाठीचा हा बालकथासंग्रह... मुलांच्या भावविश्वात घेऊन जाणाऱ्या, आनंदासोबतच नकळत मूल्यसंवर्धन करणाऱ्या त्यांच्याच भाषेत अवतरलेल्या या सुंदर बालकथा...

### छोट्यांचा मोठा प्लॅन
आणि इतर गोष्टी

मुग्धा शेवाळकर

किंमत : ₹ ७०/- । (ट.ख. ₹ ५०)

# संपादकीय

*लोकांमध्ये वाचनाची आवड निर्माण करणं, त्यांना पुस्तकांचं महत्त्व सांगणं हा प्रामुख्यानं 'पुस्तक दिन' साजरा करण्यामागचा उद्देश आहे. 'युनेस्को'नं सन १९९५मध्ये सर्वप्रथम या दिवसाची 'जागतिक पुस्तक दिन' म्हणून घोषणा केली आणि जगभर तो साजरा होऊ लागला. खरं तर पुस्तकांचं वाचन हे केवळ ज्ञान किंवा माहिती मिळवण्याचं साधन नसून आपल्या समग्र व्यक्तित्वाच्या विकसनातील एक महत्त्वपूर्ण बाब आहे..*

वाचकहो नमस्कार.

२३ एप्रिल हा जागतिक पुस्तक दिन. सर्वप्रथम त्यानिमित्ताने आपणांस हार्दिक शुभेच्छा! जगविख्यात नाटककार,कवी विल्यम शेक्सपिअर याचा हा जन्मदिन आणि स्मृतिदिनही. मनात आलं की, अवघं जीवित व्यापण्याची, ते सर्वांगसुंदर, परिपूर्ण करण्याची क्षमता असणाऱ्या ग्रंथांचं मोल ज्या दिवसानं विशेषत्वानं अधोरेखित होतंय, त्या दिवसाच्या शुभेच्छा आपणांस एका मुक्त संवादातून, चिंतनातून द्याव्यात.

पुस्तकविश्व किती सुंदर आहे हे त्याची नित्यनेमाने सफर करणाऱ्या व्यक्ती समजू शकतील. जीवमात्रांना जगण्यासाठी हवा, अन्न, पाणी, निवारा या मूलभूत गोष्टी हव्या असतात; पण मनुष्यमात्रांना याखेरीजही समृद्ध जगण्यासाठी, जगण्याचं प्रयोजन उकलण्यासाठी पुस्तकांची साथसंगत हवी असते. पुस्तकांच्या आणि आपल्या नात्याचं हे झालं मूलभूत आकलन; मात्र यापुढे विचार येतो तो पुस्तक निवडीसंदर्भातला. आपल्या मर्यादित आयुष्यात अमर्याद होण्यासाठी, चेतना उंचावण्यासाठी जगातील विपुल साहित्यातून उचित पुस्तकं आपल्या हाती पडणं महत्त्वाचं आहे. त्यातूनच आपल्या जीवनाची दिशा उजळत असते. अन्नाप्रमाणेच त्यांचीही तहानभूक आपल्या जीवाला जाणवायला हवी. 'एक झाड दोन पक्षी' या विश्राम बेडेकर यांच्या आत्मचरित्रातील एक हृद्य प्रसंग या संदर्भाने सांगण्यासारखा आहे. महाविद्यालयाच्या वाटेवरील एका दुकानात त्यांनी गोविन्दाग्रजांचे 'वाग्वैजयंती' हे पुस्तक पाहिले. ते त्यांचे अत्यंत आवडते कवी; पण खिशात

दमडीही नसल्याने त्या दुकानाच्या काचेला अगदी चिकटून उभे राहून बेडेकर केवळ ते पुस्तक एकटक पाहत राहिले. हा नित्यक्रम झाला. बेडेकरांच्या 'श्रीराम' या जिवलग मित्राच्या ही गोष्ट लक्षात येताच त्याने ते पुस्तक खरेदी करून त्यांच्या हाती ठेवले. त्याक्षणी बेडेकरांचे हृदय अगदी भरून आले होते.याच जिवलग मित्राच्या 'श्रीराम' या नावावरून व स्वत:च्या मूळ 'विश्वनाथ' या नावावरून बेडेकरांनी 'विश्राम' हे उपनाम (टोपणनाव) स्वीकारले व त्या नावाने पुढे आपले संपूर्ण लेखन प्रसिद्ध केले. पुस्तकांचं आपल्या आयुष्यातील असं अद्वितीय स्थान मानणारे, ती आस घेऊन जगणारे किती जण या जगात असतील?

या अक्षर वाङ्मयाच्या जन्मापासूनच संतांनी, विचारवंतांनी पुस्तकांचं, वाचनाचं मोल आपल्याला सांगितलंय. तुकाराम महाराज म्हणतात, '*पाहुनिया ग्रंथ करावें कीर्तन । तेव्हा आलें जाण फळ त्याचे ।।*' तर समर्थ रामदास म्हणतात, *'अखंड एकांत सेवावा। अभ्यास चि करीत जावा। काळ सार्थकचि करावा। जनासहित।।'* रामदासांना येथे सार्थ पुस्तकांचे वाचन-चिंतन-मनन अपेक्षित असावे; येथे 'जनांसोबतचा एकांत' ही किती विलक्षण गोष्ट सांगितलीय रामदासांनी! रामदासच पुन्हा म्हणतात, *वाचिले ते वाचावे। पुन:पुन्हां।।*

वाचन ही कृती महत्त्वाचीच आहे; पण कोणत्या पुस्तकांचे कोठे, किती, कसे आणि किती वेळा वाचन करावे हे सारे प्रश्नही तितकेच महत्त्वाचे आहेत. 'प्राईड अँड प्रेज्युडीस', 'सेन्स अँड सेन्सिबिलिटी' या जगप्रसिद्ध कादंबऱ्या लिहिणारी इंग्लिश साहित्यिक जेन ऑस्टेन म्हणते, " When I have my own house, I will be sad if it doesn't have a great library." येथेही पुस्तकांच्या निव्वळ संग्रहापेक्षा नेमका संग्रहच अपेक्षिला आहे. अमेरिकन साहित्यिक डेव्हिड हेन्री थोरो यानं तर 'Walden' या त्याच्या जगविख्यात पुस्तकातून वाचनक्रियेचं मूलगामी चिंतन जगासमोर मांडलंय. वेगवेगळ्या जगात राहूनही जाणती मनं एकसारखीच चित्रं कशी रंगवतात, मूल्यं कशी मांडतात, सर्वकल्याणाचं स्वप्न कसं पाहतात हे अनुभवण्यासारखं आहे. हे सगळं पुस्तकं वाचल्याशिवाय कसं बरं समजेल? आपलं मन चंचल, अस्थिर आहे. कुठलीही चांगली सवय त्याला जाणीवपूर्वक, शिस्तीनं लावावी लागते. वाचनव्यासंगाचंही तसंच आहे.

वाचकहो, आता हेच पाहा न... मिठाईच्या दुकानात विविध प्रकारच्या मिठाया असल्या तरी आपण त्या सर्व खरेदी करत नाही. आपली प्रकृती, आवड यांनुसार निवडून घेतो. तत्त्वत: पुस्तकांच्या बाबतीत आपण असा विचार करतो का? हे एकदा आपल्या मनाला विचारायला हवं. आयुष्यभर केवळ वाचन करायचं ठरवलं तरी आपण एकाच भाषेतील सारी ग्रंथसंपदाही वाचू शकणार नाही. वाचन नित्यकर्म होण्यासाठी मनाला वारंवार बजावायला हवंय.

*परत ये परत ये मम मनोमय मृगा। वय तुझे जिवलगा सरत ये सरत ये...।।* या कवी चंद्रशेखर यांच्या काव्यपंक्ती किती अन्वर्थक आहेत! मृगासारख्या आपल्या चंचल मनाला बाह्याची ओढ स्वभावत: आहे. भौतिक सुखसोयींच्या मृगजळामागे धावता-धावता मन दमून जातं, या धावपळीत आयुष्य सरत चाललंय याचं भान हरवतं, हेही त्याच्या जाणिवेत उतरत नाही. आपल्याच मनाला 'जिवलगा' अशी अगदी आतून साद घालत 'थाऱ्यावर परत ये' असं सांगणं म्हणजे खरं जीवन आकळणं आहे. थोर व्यक्ती विश्वाच्या पसाऱ्यात न हरवता मोजकेच साहित्य का शिरोधार्य मानतात त्याचं गमक यात सामावलंय. विविध तपशीलांतील तत्त्व उमजणं महत्त्वाचं आहे. पुस्तके कशासाठी तर वाचनासाठी, वाचन कशासाठी तर जगणं उमजण्यासाठी, तत्त्वं समजण्यासाठी आणि तत्त्वं अथवा मूल्यं कशासाठी तर त्यांसह जगण्यासाठी!

समाजात पुस्तकवाचनातून हे सारं असंच घडत आलं असतं तर आजचं जगाचं चित्र वेगळं असलं असतं. दिसामाजि नवनवीन साहित्य निर्माण होतंय, वाचन चळवळींतून पुस्तकालयं, वाचनालयं वाढीस लागलीयत, पुस्तक दिनाच्या निमित्ताने, प्रसंगविशेषाने वाचनाचे महत्त्व पुन्हापुन्हा सांगितले जातेय. तरीही व्यक्तिजीवनाचं आनंदमयी सुखचित्र दृष्टिपटलावर उमटत नाही. पण हरकत नाही. आपण माणसं आदर्श जीवनाचे वाटसरू आहोत. आपण सकारात्मक राहूयात.

अंतिमत: वाचनातून माणूस घडणे महत्त्वाचे आहे हे स्वत:सह इतरांसोबतच्या संवादातून सदोदित चिंतनात घेऊयात. आपल्या प्राणसंवेदनेला कोण्या यमरात्रीनं झडपण्याआधी प्रत्येक दिवसाच्या प्रकाशमय प्रसन्नतेला सुंदर पुस्तकसांगातीसह सन्मुख होऊयात. वाचलेले श्वासाइतकेच अंतरंगात मुरवूयात. म्हणजे आपलं जगणं चैतन्याचा झरा होऊन जाईल. बुद्धांची दृष्टी अपरिग्रह करण्याची आहे. केवळ ग्रंथसंग्रह नको; तर त्या आधारे ज्ञानी होण्यासाठी आपण प्रयत्नशील राहूयात. उत्तम वाचक केवळ ज्ञानी न होता बुद्धच होतो. ज्ञानाची पहिली पायरी बोध होणं ही असून तिच जगण्याची उच्चतम श्रेणी आहे. मनुष्य जन्माला संपन्न करणाऱ्या भारतीय विपुल साहित्यसृष्टीप्रमाणेच पाश्चात्य साहित्यातही असलेली विश्रांतिस्थळे आपण शोधूयात. व्हिक्टर ह्युगो, बर्टोल्ट ब्रेख्त, वॉल्ट व्हिटमन, कोलारीज, कीट्स, लिओ टॉलस्टॉय, इमर्सन, एमिली डिकीन्सन, डेव्हिड हेन्री थोरो, खलिल जिब्रान, जलालुद्दीन रुमी, हर्मन हेसे अशा अनेक विभूतींनी आपल्या जीवनजाणिवांनी पक्व होत, वाचन-लेखनातून स्वत:च्या आयुष्याची पायवाट प्रशस्त करत अफाट मानवीजगताच्या मूलकंदापर्यंतचा प्रवास केलाय. अशा थोर भावसंपन्न व्यक्तित्वांबरोबरचा प्रवास म्हणजे वैभवशाली अंत:करणांसोबतची सहलच आहे.

राजहंसने नेहमीच 'विषयांचे वैविध्य, आशयाची समृद्धी!' हे ब्रीद कसोशीने

सांभाळत उत्तम पुस्तक निर्मिती करत वाचकांची भावओंजळ समृद्ध केलीय. प्रस्तुत अंकातून आपणास त्यातील काही पुस्तकांचा परिचय घडवलाय. त्यासोबतच विल्यम शेक्सपिअरच्या नाट्यसंपदेसंदर्भातील माधव वझे यांची मौलिक टीपणे दिली आहेत. ती रोचक तर आहेतच, पण मानवी मनाचं, नातेसंबंधांचं आगळं दर्शन घडवणारीही आहेत. आपणांस त्यांतून वाचनानंद लाभेल अशी आशा आहे.

येथे मांडलेला हा विचार पूर्णत: नवीन नाही; मात्र हा विचार आपल्यात नवी जाणीव निर्माण करेल असा विश्वास वाटतो. रसिक वाचकांचा आम्हांस नेहमीच उत्तम प्रतिसाद मिळत आलाय. तेव्हा आपला प्रतिसाद, प्रतिक्रिया, राजहंसी पुस्तकांविषयीचा आपला अभिप्राय आमच्यापर्यंत जरूर पोहोचवा.

पुनश्च एकदा सर्वांना जागतिक पुस्तक दिनाच्या हार्दिक शुभेच्छा!

***डॉ. प्रिया निघोजकर***, कार्यकारी संपादक

## वाचकांच्या अंगणात नव्याने उतरलेली 'राजहंसी' पुस्तके


हा आहे युरोलॉजिस्टांच्या चार पिढ्या घडवणाऱ्या डॉ. शरद बापट यांचा प्रेरक जीवनप्रवास... तसंच भारतातील 'युरोलॉजी' या वैद्यकीय शाखेच्या वाटचालीचा आणि या क्षेत्रातील ६० वर्षांतल्या अचाट तांत्रिक प्रगतीचा आलेख...



**एका यशस्वी युरोलॉजिस्टची वाटचाल**

संकल्पना आणि लेखन : शिल्पा शिवलकर

किंमत : ₹ ४५०/- । (ट.ख. ₹ ५०)



ही कहाणी आहे एका आधुनिक सुश्रुताची... तसंच हा आहे 'पुणे टेक्निक' हे नवं शल्यतंत्र विकसित करणाऱ्या सुप्रसिद्ध शल्यचिकित्सक डॉ. शैलेश पुणतांबेकर यांच्या अनोख्या प्रवासाचा घेतलेला वेध...

**स्कालपेल ते स्कोपी ते रोबो**

डॉ. चित्रलेखा पुरंदरे

किंमत : ₹ ३५०/- । (ट.ख. ₹ ५०)

# राजहंसी विशेष

## अनुवाद आणि मी

*राजहंस परिवारातील संपादक शिरीष सहस्रबुद्धे यांना नुकताच नांदेड येथे संपन्न झालेल्या 'तिसऱ्या अनुवादक संमेलना'त त्यांच्या लेखन, संपादन, अनुवाद, अध्यापन आणि व्यवस्थापन क्षेत्रातील भरीव योगदानाबद्दल 'जीवनगौरव पुरस्कार' प्राप्त झाला. या निमित्ताने त्यांच्या अनुवाद कार्याविषयी जाणून घेऊयात या लेखातून...*

'फोडिले भांडार, धन्याचा हा माल। मी तो हमाल, भारवाही।।' असं संतश्रेष्ठ तुकाराम महाराजांनी लिहून ठेवलंय. हाच दृष्टिकोन अनुवादकाचा असायला हवा, असं मानून माझ्या हातून झालेल्या (प्रकाशित) अनुवादांची संख्या एव्हाना २२ झाली आहे. त्यातले ११ अनुवाद मराठीतून इंग्लिशमध्ये तर उरलेले ११ इंग्लिशमधून मराठीत केलेले आहेत. याखेरीज तीन अनुवाद प्रकाशनाच्या वाटेवर आहेत, आणि दोन आत्ता हातात चालू आहेत. या अनुवादांतून काय मिळालं असा प्रश्न काही वेळा विचारला जातो. धनलाभ फारसा होत नाही, याची कल्पना बहुधा सर्वांनाच असते. पण ज्या भाषांचं बोट धरून जन्मलो आणि वाढलो, त्यातल्या काही भाषांचं भांडार तरी आपल्या चवलीपावलीनं वाढलं पाहिजे ही आकांक्षा ठेवली, तर ती पूर्ण होऊ शकते. मातृभाषेत उपलब्ध नसलेलं काहीतरी मूल्य आपण आत आणलं, हे समाधान मिळू शकतं. तसंच आपल्या मातृभाषेकडे इतरांना देण्यासारखं जे काही मौलिक होतं, त्यातलं कणभर तरी आपण योग्य ठिकाणी पोचवायचा प्रयत्न केला, हा संतोषही थोडा नसतो.

चांगल्या लेखकांच्या चांगल्या संहिता लाभाव्यात ही प्रत्येक अनुवादकाची मनीषा असतेच. पत्रकार व लेखक म्हणून अरुण शौरी ऐन भरात होते तेव्हा त्यांच्या तीन पुस्तकांचे अनुवाद करायची संधी मला मिळाली आणि त्यातल्या 'व्यक्ती, संस्था, प्रक्रिया' या अनुवादाला महाराष्ट्र साहित्य परिषदेचा स. ह. मोडक पुरस्कारही लाभला. तसेच भारतीय सैन्यदलाचे निवृत्त उपप्रमुख ले. जनरल जमीरुद्दिन शाह यांच्या 'सरकारी मुसलमान' या पुस्तकाच्या अनुवादाला; माझं एक दैवत असलेल्या जी. ए. कुलकर्णींच्या नावाचा पुरस्कार गोवा हिंदू असोसिएशन, मुंबई यांच्याकडून लाभला, आणि तोही जी.ए. जन्मशताब्दी वर्षातच. हेही सुदैव. या दोन्ही संधी अनुक्रमे मेहता

पब्लिशिंग हाऊस आणि राजहंस प्रकाशन यांच्या सौजन्याने मिळाल्या.

हॅरी पॉटरच्या सेलिब्रिटी लेखिका जे. के. रोलिंग यांच्या दोन पुस्तकांचे अनुवाद माझ्या हातून झाले आणि त्यांचे इंग्लंडमधील प्रकाशक ब्लूम्सबरी यांच्या भारतातील शाखेनंच ते प्रसिद्ध केले, हाही संस्मरणीय योग. मी मूळचा इंग्लिशचा विद्यार्थी व शिक्षक. विल्यम शेक्सपिअर हे माझं दैवत. त्यांच्या 'ज्युलियस सीझर' व 'मर्चंट ऑफ व्हेनिस' या माझ्या आवडत्या नाटकांचे अनुवाद करायची संधी वैशाली प्रकाशन यांच्यामुळे मिळाली. शेक्सपिअरच्या आणखीही काही नाटकांचे मराठी अनुवाद माझ्या हातून होतील अशी आशा आहे.

साहित्यशारदेच्या दरबारात अनुवाद आणि अनुवादक यांची परिस्थिती पूर्वीपेक्षा सुधारली असली, तरी अजूनही त्यांना म्हणावी अशी मान्यता मिळत नाही ही वस्तुस्थिती आहे. तरी आम्हा अनुवादकांचं अनुवाद करण्यातलं स्वारस्य कायम टिकून राहतं, हे विशेष. याचं एक कारण अनुवाद ही कला अनुवादकाला खूप काही देऊन जाते. भाषा ही निव्वळ सुसंवादाचं साधन नसून संस्कृतीचं वाहनही असते. अनुवादातून आपण केवळ भाषा बदलत नसून एका संस्कृतीचे काही अंश दुसऱ्या संस्कृतीला नजराणा म्हणून पोहोचते करतो. फिक्शन अनुवादित करताना तर हे जाणवतंच. परंतु आपल्याच देशाचा इतिहास, आपली संस्कृती यातील चाणक्य, चंद्रगुप्त व अशोक या व्यक्तिरेखांना केंद्रस्थानी ठेवून, नागपूरचे तरुण अभियंता लेखक श्रेयस भावे यांनी इंग्लिशमध्ये कादंबरी 'त्रिधारा' लिहिली. तो सुमारे ११०० पानांचा ऐवज दोन सहकारी अनुवादक आणि मी मिळून राजहंस प्रकाशनातर्फे मराठीतून वाचकांना नजर केला, तेव्हाही केवढा तरी आनंद मिळाला. आपल्याच देशाच्या पण काळाच्या पडद्याआड गेलेल्या एका प्रदीर्घ कालखंडाचं, थरारक घटनाक्रमाचं आणि बुलंद व्यक्तिमत्त्वांचं अद्‌भुत रसायन आपण अनुभवलं आणि वाचकांना अनुभवायला सादर केलं, याची अत्यंत धन्यता वाटली.

व्यक्तिश: मला संस्कृती, सांस्कृतिक इतिहास आणि अर्थातच कथा-कादंबऱ्या-नाटकं यांचा अनुवाद करायला मनापासून आवडतं. मात्र माझ्या वाट्याला सामाजिक व राजकीय वैचारिक पुस्तकं अनुवादासाठी जास्त प्रमाणात आली आणि मीही ती समरसून अनुवादित केली. सावरकर विचारांची आजच्या काळातील महती सांगणाऱ्या प्रा. अशोक मोडक यांच्या पुस्तकाचा इंग्रजी अनुवाद 'द रेलेव्हन्स ऑफ सावरकर टुडे' या नावानं माझ्या हातून झाला आणि दिल्लीच्या प्रभात प्रकाशनानं तो प्रसिद्ध केला. त्यांनीच लिहिलेल्या आणखी एका मराठी मोनोग्राफचा इंग्लिश अनुवाद 'सावरकर्स पर्स्पेक्टिव्ह टू हिस्टरी' या नावानं माझ्या हातून दोन वर्षांपूर्वी पुरा झाला. दिल्लीच्या इंडियन कौन्सिल ऑफ हिस्टॉरिकल रिसर्च यांच्यातर्फे तो कधीतरी प्रकाशित होईल, अशी आशा आहे. इतर दोन सहलेखकांसमवेत प्रा. डॉ. अशोक मोडक यांनी



डावीकडून नरेंद्र चव्हाण, स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. मनोहर चासकर, शिरीष सहस्त्रबुद्धे आणि रवींद्र गुर्जर

लिहिलेल्या वैचारिक मराठी ग्रंथाचा ३५० पृष्ठांचा इंग्लिश अनुवाद माझ्या हातून झाला. 'नॅशनल आयडिऑलॉजीज अ‍ॅन्ड पॉलिटिक्स' या नावाने कॉन्टिनेन्टल प्रकाशनानं तो प्रसिद्ध केला. हेही एक ठळक उल्लेखनीय काम. याखेरीज लहान मुलांसाठी लिहिलेल्या चार छोटेखानी मराठी पुस्तकांचे इंग्लिश अनुवादही राजहंसकडून प्रसिद्ध झाले आणि ते काम मुलांसाठी असल्यामुळे भाषिकदृष्ट्या विशेष आव्हानात्मक वाटलं. त्यातही प्रसिद्ध शास्त्रज्ञ जॉर्ज वॉशिंग्टन कार्व्हर यांचं जीवनचरित्र प्रख्यात लेखिका वीणाताई गवाणकर यांनी 'किमयागार कार्व्हर' या शीर्षकानं बालवाचकांसाठी नव्यानं लिहिलं. त्याचा इंग्लिश अनुवाद 'जॉर्ज कार्व्हर द मॅजिशियन' या नावानं मी केला, तोही राजहंस प्रकाशनानं देखण्या स्वरूपात प्रकाशित केला. अनुराधा प्रभुदेसाई यांच्या 'सैनिक' या भावनिक पुस्तकाचा इंग्लिश अनुवाद राजहंस प्रकाशनसाठीच 'द सोल्जर' या नावानं माझ्या हातून झाला, हेही एक समाधान देऊन गेलेलं काम. या सगळ्या आणि इतरही अनुवादांनी व्यक्ती आणि प्रोफेशनल म्हणून मला समृद्ध केलं आणि मर्यादांचीही जाणीव करून दिली. शेक्सपिअरच्या नाटकांचे अनुवाद करताना तर या मर्यादा नक्कीच लक्षात आल्या, आणि आपण आपली इयत्ता वाढवून त्यांच्यावर मात केली पाहिजे, ही प्रेरणाही मिळाली.

शेवटी अनुवादात मन गुंतवताना आपण दुसऱ्याची मालमत्ता हाताळतो आहोत, याचं भान अवश्य ठेवायला लागतं. हा उपक्रम वाचकांसाठी आहे, 'इदं न मम' याचीही जाणीव ठेवायला लागते. अनुवादकाची अस्मिता अनुवादकार्यात मध्ये येऊन चालत नाही. जगद्गुरू तुकोबांसारख्या महात्म्याने 'गाऊ नाचू विठो, तुझा करू 'अनुवाद' ' असं लिहून ठेवलंय, त्याचा संदर्भ वेगळा खराच, पण तुकोबांचा भावही लक्षात ठेवायला हवा असं वाटत राहतं...

***शिरीष सहस्त्रबुद्धे***

# ‘जागतिक पुस्तक दिन’ विशेष

*आपल्या विलक्षण प्रतिभेच्या बळावर ज्याने अवघ्या विश्वाला मोहिनी घातली, त्या विल्यम शेक्सपिअरचा २३ एप्रिल हा जन्मदिन आणि स्मृतिदिनही. या निमित्ताने ‘विल्यम शेक्सपिअर : जीवन आणि साहित्य’ या के. रं. शिरवाडकर लिखित पुस्तकाच्या विशेष आवृत्तीत समाविष्ट असलेल्या आणि रंगकर्मी माधव वझे यांनी केलेल्या या मौलिक नोंदी...*

शेक्सपिअरने त्याच्या नाटकांमध्ये प्रतिसृष्टी निर्माण केली, तो जीवनाचा भाष्यकार आहे; असा या थोर नाटककाराचा सार्थ गौरव गेली चारशे वर्षे होत आहे. मनुष्य केवळ नियतीच्या हातातले बाहुले आहे, असे प्रमेय असलेल्या ग्रीक रंगभूमीला छेद देऊन माणूस स्वत:च्या अध:पतनाला व विनाशाला कारणीभूत असतो; अशी धारण ठेवून शेक्सपिअरने नाटके लिहिली आणि जागतिक रंगभूमीवर ऐतिहासिक परिवर्तन घडवून आणले. किंग लिअरमध्ये येणारे ‘As flies to the wanton boys, are we to the gods- They kill us for their sport’ (4/1/38/-39) हे तिथे निराळ्या संदर्भात आलेले विधान ग्रीक रंगभूमीच्या स्वरूपाची कल्पना देते, तर ‘The fault, dear Brutus, is not in our stars but in ourselves.’ हे ‘ज्युलिअस सीझर’मधील कॅशिअसच्या तोंडी असलेले वाक्य (१/२/१३९-४०) एलिझाबेथन आणि प्रामुख्याने शेक्सपिअरच्या रंगभूमीशी नाते सांगते. शेक्सपिअरने नाटक जमिनीवरती आणले. ते तुमचे आमचे सर्वांचे केले.

‘ओल्डविक’ला ‘हॅम्लेट’ची तालीम सुरू होती. पोलोनिअस काही नटांना घेऊन येतो. त्यांच्या अभिनयाचा एखादा नमुना सादर करायला हॅम्लेट त्यांना सांगतो. त्यांच्यातील एक नट एक उतारा म्हणून दाखवतो. नटांची नीट व्यवस्था करण्याची सूचना राजपुत्र पोलोनिअसला देतो आणि त्याच्याबरोबर जाण्याची आज्ञा तो नटांना करतो. बरोबर आणलेली वाद्ये तिथेच सोडून सगळे नट पोलोनिअसच्या पाठोपाठ आत जातात आणि मग सुरू होते हॅम्लेटचे स्वगत, ‘आता मी एकटा आहे...’ राजासमोर नाटकाचा खेळ करून राजाच्या अंतर्मनाचा शोध घेण्याचा निश्चय हॅम्लेट त्या स्वगतात करतो.

तालीम सुरू होती. ठरल्याप्रमाणे पोलोनिअसच्या मागोमाग सगळे नट आत गेले आणि हॅम्लेटच्या भूमिकेतल्या ॲलेक गिनीजने स्वगत सुरू केले, ‘आता मी एकटा आहे...’ ॲलेक गिनीजला स्वत:ला कळण्याच्या आत त्याच्या बोटांनी तिथेच असलेल्या ड्रमवर ताल धरला आणि त्या तालाच्या अंदाजाने गिनीजने संपूर्ण स्वगत म्हटले.

ॲलेक गिनीजने जे केले, ते सारे अकल्पित आणि सुंदर होते. दिग्दर्शकाला ते खूपच आवडले आणि अगदी तसेच प्रयोगातही करायचे ठरले.

अगदी हाच नाही, पण असा अनुभव अनेक नटांना आला असण्याची शक्यता आहे. तालमी करतानाच नाटकातल्या इतर वस्तूसुद्धा रंगमंचावर असायला पाहिजेत, असा आग्रह नट धरतात, त्याला काही अर्थ असतो. पण त्याचबरोबर हेही महत्त्वाचे की नट-नटींनी तालमींमध्ये शरीर – मनाने पूर्ण मोकळे असले पाहिजे आणि स्वत:च्या उर्मीनुसार जे जाणवते ते करून पाहिले पाहिजे. उत्स्फूर्तपणे जे उमटते, ते अनेकदा अतिशय चपखल आणि म्हणूनच सुंदर असते. नटनटी संवेदनशील असतात, बुद्धिमान असतात आणि सर्जनक्षमही असतातच.

चर्चा सुरू होती. ''हॅम्लेट नाटक कशाबद्दल आहे?'' प्रत्येक जण आपापल्या परीने उत्तर देत होता. त्या नाटकाचे समीक्षकांनी लावलेले अर्थ कोणीकोणी सांगत होते. नाटकात स्मशानातल्या कामगाराची भूमिका करणाऱ्या नटावर आता उत्तर देण्याची वेळ आली होती. 'हॅम्लेट नाटक कशाबद्दल आहे?' क्षणात त्याने उत्तर दिले, ''हॅम्लेट नाटक हे स्मशानातल्या कामगाराबद्दल आहे.'' ऐकणारे सगळे हसायला लागले. त्यावर तो नट म्हणाला, ''तुम्ही सगळे जण म्हणता ते खरं असेल; ते खरं आहेच. पण माझं या नाटकातलं काम चांगलं व्हावं, असं मला वाटत असेल; तर हे नाटक स्मशानातल्या कामगाराबद्दलचंच आहे, असं मी स्वत:ला सांगितलं पाहिजे.''

त्या नटाने - स्तानिस्लावस्कीने आपल्या 'माय लाइफ इन आर्ट' या ग्रंथात काय म्हटले आहे, ते वाचले असावे. स्तानिस्लावस्की म्हणतो, 'Roles are never small: actors are small.' एलिझाबेथन रंगभूमीवर नटाला फक्त त्याचे संवाद दिले जात असत. नाटकात काय घडते, हे त्याला कुठे ठाऊक होते? अशा वेळी त्याला हे समजून घेणे भागच होते, की नाटक तो करीत असलेल्या भूमिकेविषयी आहे.

नाटकाने पछाडलेले अस्वस्थ आत्मे आपल्यामध्येच असतात. ते नाटक खातात, नाटक पितात, नाटक हा त्यांचा श्वास असतो. त्यांच्या ध्यानीमनी आणि स्वप्नीही नाटकच असते. अशाच एका नाटक जगणाऱ्या प्रतिभावंताची सत्यकथा :

'ट्वेल्थ नाईट' नाटकाच्या तालमींचे दिवस. मालवोलिओची भूमिका ऑलिविए करीत होते आणि दिग्दर्शक होते जॉन गिलगुड. एका मध्यरात्री ऑलिविए यांचा फोन खणखणला. त्यांनी फोन घेतला, पलीकडून गिलगुड बोलत होते, ''लॅरी, मला काय वाटतं, की तू मालवोलिओ खूप जाडजूड आहे, असं समजून करावास – काय?'' गाढ झोपेतून अचानक जागे झालेल्या ऑलिविएनी गिलगुड यांचे बोलणे

तोडत बोलायला सुरुवात केली, ‘‘जॉन, अरे आता रात्रीचे दोन वाजले आहेत...!’’ ऑलिविएच्या बोलण्याने पार गोंधळून गेलेल्या गिलगुड यांना आता आपण काय बोलावे, ते क्षणभर कळलेच नाही. ते अजूनच गोंधळले आणि कसेबसे म्हणाले, ‘‘ठीक आहे, ठीक आहे; तर मला काय वाटतं, की मालवोलिओ एकदम हडकुळा आहे, असं समजून तू तो करावास.’’ आणि घाईघाईने त्यांनी फोन बंद केला.

टोनी गुथ्री हा आधुनिक ब्रिटिश रंगभूमीवरचा एक अतिशय कल्पक आणि यशस्वी दिग्दर्शक.

हॅम्लेटची प्रेयसी ऑफेलिआ भ्रमिष्ट होते आणि एका ओढ्यात तिचा मृतदेह सापडतो. शासकीय इतमामाने तिची अंत्ययात्रा स्मशानभूमीमध्ये येते. कोणी तसे बोलून दाखवीत नसले, तरी एका विचित्र राजकारणात तिचा बळी गेल्याची भावना प्रत्येकाच्या मनोमन आहे आणि नाट्यप्रयोगाच्या प्रेक्षकांनाही त्या घटनेने चुटपुट लागते.

ऑफेलिआच्या अंत्ययात्रेच्या वेळचे उदास वातावरण अधोरेखित करण्यासाठी टोनी गुथ्रीने अंत्ययात्रेमध्ये आलेल्या प्रत्येकाच्या हातामध्ये पांढरी छत्री दिली. स्मशानातली शांतता, अस्फुट संगीत आणि सर्वत्र फटफटीत पांढरा रंग - रंगांच्या परिणामकारकतेचा अचूक अंदाज चमत्कार घडवून आणू शकतो. टोनी गुथ्रीच्या प्रयोगाची विशेष दखल ‘हॅम्लेट विथ अंब्रेलाज’ अशा शब्दांत नाट्यसमीक्षकांनी घेतली.

‘दि टेंपेस्ट’ हे शेक्सपिअरचे शेवटचे नाटक. नाटकातला शेवटचा पाचवा अंक. मत्सर, राज्य बळकावणे, हद्दपारी, खुनाचा कट, सूड - सगळे संपून ‘ज्याचा शेवट गोड, ते सारे गोड’ या वळणावर नाटक आलेले.

वृद्ध दरबारी गोंझालोला अगदी भरून आले आहे. आपली भावना व्यक्त करताना



जगभरातल्या अनेक प्रज्ञावंतांना, कलावंतांना, लेखकांना, रंगकर्मींना, समीक्षकांना अन् विचक्षण वाचक-प्रेक्षकांना चार शतकांहून अधिक काळ भारू टाकणाऱ्या प्रतिभावंताच्या प्रत्यक्ष भेटीचा आनंद देणारा संग्राह्य ठेवा...

**विल्यम शेक्सपिअर** : जीवन आणि साहित्य

के. रं. शिरवाडकर

आवृत्ती पाचवी । किंमत : ₹ ३३०/- । (ट.ख. ₹ ५०)

तो म्हणतो, ‘आपल्यापैकी प्रत्येक जण सैरभैर झाला होता; पण आता आपण पुन्हा आपल्यापाशी, स्वत:पाशी आलो आहोत...’ प्रयोगात गोंझालोची भूमिका सिरील लुखॅम करत होता. प्रॉस्पेरोच्या भूमिकेत होते जॉन गिलगुड. ‘आपल्यापैकी प्रत्येक जण सैरभैर झाला होता.’ असे म्हणताना सिरील लुखॅम रंगमंचावर अक्षरश: रडत असे. त्याला रडू यायचेच. गिलगुडनी त्याला सांगितले, ‘‘सिरील, रडू नकोस. तू रडलास, तर प्रेक्षक रडणार नाहीत.’’ पण खरे तर प्रॉस्पेरो झालेल्या गिलगुडनाच अश्रू आवरत नसत. म्हणून सिरील त्यांना म्हणाला, ‘‘पण जॉन, तू स्वत: रडतोसच की!’’ त्यावर त्या थोर नटाने काय म्हणावे? गिलगुड म्हणाले, ‘‘हो, मला माहीत आहे, की मीसुद्धा रडतो. पण अरे बाबा, मी मूर्ख आहे.’’

***माधव वझे***, ९६०४८४८०३३

। आनंदवार्ता ।

सन्मान राजहंसचा - अविरत अक्षरसेवेचा




मराठी भाषेचा पैस विस्तारण्यात
मौलिक योगदान देत असल्याबद्दल
राजहंस प्रकाशनाचा सन्मान करण्यात आला.
प्रकाशनाचा वतीने हा सन्मान
संपादक शिरीष सहस्रबुद्धे यांनी स्वीकारला.



## ‘राजहंसी’ विविधा



मिस्कील आणि मनस्वी. प्रेमळ आणि फटकळ.
नर्मविनोदी आणि स्पष्टवक्ती. आग्रही आणि पारदर्शी.
सईच्या व्यक्तिमत्त्वाचे विविध पैलू
उलगडणारे आत्मकथन!

### सय माझा कलाप्रवास

सई परांजपे

आवृत्ती सहावी । किंमत : ₹ ४५०/- । (ट.ख. ₹ ५०)

गुरुदत्तच्या चित्रनिर्मितीच्या ऐतिहासिक आणि
सामाजिक पार्श्वभूमीबरोबरच सदर पुस्तकात गुरुदत्तच्या
चित्रपटांचा कथावस्तू, घाट, तंत्र आणि आशय
या अंगांनी विचार केला आहे.

### गुरुदत्त
तीन अंकी शोकांतिका

अरुण खोपकर



आवृत्ती तिसरी । किंमत : ₹ ४५०/- । (ट.ख. ₹ ५०)



त्यांनी मराठी रंगभूमीला नवं भान दिलं.
त्यांच्या दिग्दर्शनामुळे कलाकारांना नवी दृष्टी आली.
त्या सांगत आहेत,
स्वत:ची आणि मराठी रंगभूमीची कथा.

### झिम्मा
आठवणींचा गोफ

विजया मेहता

आवृत्ती आठवी । किंमत : ₹ ६५०/- । (ट.ख. ₹ ५०)

# ऐवज विचारांचा

*'सहं'चे लेखन म्हणजे तर्ककठोर बुद्धी आणि माणसाचे मन यांच्यातला दुवा असणारा मोलाचा मध्यबिंदू आहे. म्हणूनच या कंठाळी वातावरणात हा 'ऐवज' वाचावा आणि मनात मुरवून घ्यावा.*

सखाराम हरि उपाख्य स. ह. देशपांडे हे गेल्या पिढीतील विचारवंत. अर्थशास्त्राचे प्राध्यापक, 'समाज प्रबोधन पत्रिके'चे संपादक, 'ग्रामायन'चे संस्थापक-सदस्य आणि हिंदुत्व, धर्मनिरपेक्षता या विषयांवर साधार, मूलग्राही लेखन करणारे भाष्यकार ही त्यांची ओळख. विपुल ग्रंथसंपदा असूनही ते तसे दुर्लक्षित राहिले, अभ्यासक्षेत्राच्या पलीकडे ते फारसे ज्ञात नाहीत. एकदा 'हिंदुत्ववादी' असा शिक्का बसल्यावर त्या व्यक्तीकडे दुर्लक्ष करणारी एक बाजू आणि कठोर आत्मपरीक्षण करावयास लावणारे लेखन केले, म्हणजे 'हे आमचे नव्हेत' म्हणून दूर लोटणारी दुसरी बाजू, हे आपले सामाजिक भागधेय आहे, हे यामागचे कारण असावे. हिंदुत्ववाद, हिंदुहित आणि हिंदुराष्ट्र हे मुद्दे चर्चाव्यूहाच्या मध्यगामी असताना सहंची तर्ककठोर आणि व्यापक हिंदुत्वाची मांडणी, धारदार बुद्धिवाद, व्यक्तिस्वातंत्र्याला पुरेसे महत्त्व देणारी, पण 'मी' पासून 'आम्ही' पर्यंत जाणारे एकत्वाचे तत्त्वज्ञान राष्ट्रवादाच्या चौकटीत मांडणारी भूमिका समजून घेणे प्रासंगिक ठरेल.

सहंचे साहित्य विपुल असले, तरी त्यातले काही अनुपलब्ध आणि काहीसे विस्कळीत आहे. अशा वेळेस, त्यांच्या समग्र लिखाणाचा सारांश 'वेचक' स्वरूपात समोर येणे आवश्यक होते. हिंदुत्व वा राष्ट्रवादासारखे विषय राजकारण आणि समाजकारणातले कळीचे मुद्दे झालेले असताना मराठीतल्या या महत्त्वाच्या भाष्यकाराचे लिखाण आजही दुर्लक्षित असणे, ही उणीव होती. विशेषत: चर्चाविश्व अधिकाधिक कंठाळी होत असताना साक्षेपी प्रतिपादन समोर येण्याची अधिकच आवश्यकता होती. 'राजहंस'ने प्रकाशित केलेल्या 'ऐवज' या संपादित ग्रंथाने ही उणीव भरून काढली, असे म्हणता येईल.

या ग्रंथाचे एकूण चार विभागांत वर्गीकरण केले गेले असून, पाच संपादकांनी संपादनाला हातभार लावला आहे. राष्ट्रवाद, समाजकारण आणि अर्थकारण, व्यक्तिचित्रे व संकीर्ण असे चार विभाग असून, पुस्तकाचा विभागवार परिचय करून

**अभिनंदन!**

## अभिव्यक्ती वैदर्भीय लेखिका संस्था, नागपूर



उत्कृष्ट आत्मचरित्र
प्रथम पुरस्कार

**विवाह नाकारताना**

◆

विनया खडपेकर





उत्कृष्ट कादंबरी
प्रथम पुरस्कार

**सीता**

◆

अभिराम भडकमकर




**अभिनंदन!**

## पद्मगंधा साहित्य प्रतिष्ठान, नागपूर



सुधा कुसुम साहित्य पुरस्कार
(राज्यस्तरीय)

**दौशाड**

◆

डॉ. नंदकुमार राऊत



घेणे आवश्यक ठरावे.

हिंदुत्वाच्या संदर्भात एक निरीक्षण नोंदविणे आवश्यक ठरेल. या शब्दाला प्रतिगामीपणाच्या साचेबद्ध स्वरूपात सादर करण्याची प्रथा पडून गेली असली, तरीही या शब्दात पुरोगामी ते प्रतिगामी अशा अनेक छटा अनुस्यूत आहेत. राष्ट्रवादाचीही तीच तऱ्हा आहे. प्रचलित राष्ट्रवादी तत्त्वज्ञानाची शोकांतिका ही की ते व्यक्तीला फारसे महत्त्वच देत नाही. 'सारे काही समष्टीसाठी'च्या उद्घोषात व्यक्तिवाद लुळा पडतो आणि राष्ट्रवादाचे रूपांतर फॅसिझममध्ये होण्यास सुरुवात होते. सहंचा राष्ट्रवाद तसा नसून, तो अवश्यपणे व्यक्तिकेंद्रित आहे. राष्ट्रवाद ही जगण्याची कला असून, समाज म्हणून टिकून राहण्यासाठी राष्ट्रवाद आवश्यक असला, तरी अंतिमत: राष्ट्रउभारणी व्यक्तींच्या आजच्या आणि उद्याच्या सुखासाठी करायची असते, असं ते म्हणतात.

सह स्वत: हिंदुत्ववादी असले, तरी त्यांचे हिंदुत्व अधिक राजकीय, जीवनकेंद्री राष्ट्रवादाची पृष्ठभूमी मानणारे, संस्कृतीतल्या आधुनिक काळातही टिकू शकेलशा भागाशी संवादी, अंधश्रद्धानिरपेक्ष, मुस्लीम प्रश्नाची सखोल जाणीव असणारे आणि अधिक महत्त्वाचे म्हणजे भारतासारख्या वैविध्यशाली, प्रसंगी परस्परभिन्न, परंपरांना सामावून घेणाऱ्या राष्ट्रात अजिबात टिकू न शकणाऱ्या 'एकेश्वरी पंथाला' विरोध करणारे आहे. या हिंदुत्वाचा धागा थेटपणे सावरकरांशी जुळतो आणि संघाशी त्याचे मतभेद आहेत. सहंनी ते मतभेदही मोकळेपणाने मांडले असून, 'संघातले दिवस' हा रिपोर्ताज स्वरूपाचा लेख येथे संग्रहित झाला, ही आनंदाची गोष्ट होय.

या पुस्तकातला सर्वाधिक चौरस विभाग असेल, तर तो समाजकारण आणि अर्थकारणाचा होय. ते स्वत: अर्थशास्त्राचे प्राध्यापक असल्याने अर्थशास्त्राशी संलग्न असलेल्या संकल्पनांशी त्यांचा परिचय होता. या संकल्पना केवळ पुस्तकी नाहीत, तर समाजाच्या सर्व स्तरांशी असलेले त्यांचे घट्ट नाते आणि समाजशास्त्रीय दृष्टिकोनाशी असलेली घट्ट वीण इथे प्रत्ययाला येऊ शकेल. या दृष्टीने आत्र्यांचा 'गावगाड्या'वरचा लेख किंवा भटकंतीत केलेली सामाजिक निरीक्षणे पाहायला हवीत. हिंदू समाज विघटित राहण्यामागे आणि सांस्कृतिक एकात्मता वरवरची, क्षीण उरण्यामागे जातिआधारित व्यवसायांची चिरेबंदी चौकट कारणीभूत आहे, असे त्यांचे प्रतिपादन आहे. 'पाश्चात्त्य समाज वा जीवनशैलीतून भेडसावणाऱ्या प्रश्नांना संन्यास अथवा मोक्ष हे उत्तर नसून, संयम हे उत्तर आहे आणि संयम म्हणजे अध्यात्म नव्हे' अशांसारखी वाक्ये आजूबाजूच्या परिस्थितीच्या निकषावर घासून पाहिली, तर त्यांचा नेमकेपणा समजू शकेल. अनाठायी पूर्वगौरव आणि संस्कृतीच्या 'वर्खा'वर प्रेम करणाऱ्या आजच्या काळात अर्थविचाराचा संस्कृतीशी जुळलेला हा दुर्मीळ धागा समजून घेणे मर्माचे ठरू शकेल.

या पुस्तकातला तिसरा विभाग व्यक्तिचित्रांचा आहे. सहसा, व्यक्तिचित्रे लिहिताना लेखकाची आत्मप्रौढी प्रसंगी या थराला पोहोचते, की ज्या व्यक्तीवर लिहिले गेले आहे,

तिचा माग काढणे दुर्मीळ होऊन बसते. सहंची व्यक्तिचित्रे या दोषांपासून मुक्त असून, तिथे दाखविलेले ताटस्थ्यही मनोहर आहे. ज्ञानसाधना आणि संगीत या बाबी त्यांच्या घरातच प्रतिष्ठित असल्याने डॉ. पु. ग. सहस्रबुद्धे ते वामनराव देशपांडे असोत वा कुमार गंधर्व, अथवा साहित्यातले विजय तेंडुलकर - असा हा पल्ला मोठा आहे. व्यक्तिचित्रे रेखाटताना केवळ चित्रपट उभा न करता समग्र माणूस आणि सोबतच त्याचा काळ उभा करणे हे कसब त्यांनी दाखवलेले आहे. प्रसंगी आपली मतेही निर्भीडपणे मांडली आहेत. उदाहरणार्थ, ‘मला आवडणारे तेंडुलकर त्यांच्या नाटकातून भेटत नाहीत, त्यांचं रंगभूमीला जे देणं आहे, ते मला अमान्य नाही, त्यांनी खूप नव्या वाटा तिथे ‘दाखविल्या’, त्यांच्यावरचा प्रवास पूर्ण केल्याचा तृप्त प्रत्यय मात्र नाटकं देत नाहीत.’ हे वाक्य मासलेवाईक आहे.

येथवर मी जे लिहिले, ते पुस्तकाचे अंतरंग परीक्षण होय. पण हे पुस्तक वाचल्यावर स. ह. देशपांडे ही व्यक्ती कशी दिसते? जकार्तामध्ये झालेल्या परिषदेत

स. ह. देशपांडे यांनी अर्थकारण, समाजकारण, राष्ट्रवाद आणि ललितवाङ्मय या सर्व क्षेत्रांत पाच दशकांहून अधिक काळ मुशाफिरी करून वाचकांसमोर ठेवलेला अनुभवसमृद्ध विचारांचा ऐवज...



ऐवज विचारांचा

स. ह. देशपांडे

किंमत : ₹ ५००/- । (ट.ख. ₹ ५०)

डॉक्टर-पेशंट नात्यात विसंवाद निर्माण होण्यास कारणीभूत ठरते वैद्यकीय व्यवसायातील चुरस! वैद्यकीय प्रवेशांतील गोंधळ, याविरुद्धचा लढा, प्रशासन-विद्यार्थी-पालक आणि माध्यमे यांनी एकमेकांवर व न्याययंत्रणेवर टाकलेले डावपेच या साऱ्यांचा, प्रत्यक्ष सहभागी झालेल्या तज्ज्ञाने घेतलेला वृत्तान्तवेध म्हणजे हे पुस्तक -



शह आणि काटशह

वैद्यकीय व्यवसायातील चुरस

डॉ. राजीव जोशी

किंमत : ₹ ४००/- । (ट.ख. ₹ ५०)

‘आम्ही भारतीय एकही गीत एकस्वरात म्हणू शकत नाही, राष्ट्रगीत म्हणतो, तेही एकसुरात नसते - आम्हाला राष्ट्रीय गाणे नाही, कारण आमच्या देशाला बांधणारी सूत्रेच आम्ही शोधली नाहीत’ म्हणून व्याकूळ होणारी, एका बाजूला भूतदयेचा जयघोष होत असूनही अस्पृश्यांना पशूहून क्रूर वागणूक मिळते म्हणून संतापणारी, राष्ट्रवादाच्या उदरातही व्यक्तिस्वातंत्र्याचा जयघोष करणारी आणि डॉक्टर सहस्रबुद्ध्यांच्या मर्यादा तर्कपूर्वक मांडूनही, त्यांचे ऋण स्पष्टपणे मान्य करणारी अशी तर्कशरण, पण मानवी मनाची आस्थापूर्वक जपणूक करणारी ही व्यक्ती आहे.

एका बाजूला अति भावनिकतेने आततायी निर्णय घेणारी माथी, मतांसाठी त्यांचा अनुनय करणारे नेते आणि दुसऱ्या बाजूला समाजाशी नाळ तुटलेले विचारवंत - अशा दुष्टचक्रात हा साक्षेप अतिशय प्रासंगिक आहे. तर्ककठोर बुद्धी आणि माणसाचे मन यांच्यातला दुवा असणारा हा मध्यबिंदू मोलाचा आहे. म्हणूनच या कंठाळी वातावरणात हा ‘ऐवज’ वाचावा आणि मनात मुरवून घ्यावा हा माझा सांगावा आहे.

***हर्ष अनिरुद्ध जोशी***, ९३०७५३४५२१




प्राचीन काळापासून ते भारतीय आधुनिक कलाप्रवाहापर्यंतचे एकमेकांत गुंफलेले धागे चित्रकाराच्या मर्मदृष्टीने आणि कलाअभ्यासकाच्या वस्तुनिष्ठतेने उलगडून दाखवणारा ग्रंथ

कलेतील भारतीयत्वाची चळवळ

**द बॉम्बे रिव्हायव्हलिस्ट स्कूल**

सुहास बहुळकर

किंमत : ₹ ६००/- । (ट.ख. ₹ ५०)

भारतीय रंगमंचावरील कर्तबगार रंगकर्मी, दिग्दर्शिका, अभिनेत्री, लेखिका या विविधांगी भूमिकेतील स्त्री-कलावंतांच्या व्यक्तित्वाचा आणि कर्तृत्वाचा वेध... वीस दिशादर्शक प्रश्नांच्या अनुषंगाने सर्जनशील रंगकर्मींचे हे विचार म्हणजे वाचकांसाठीचा समृद्ध ठेवा...

**वीस प्रश्न**

संकल्पना आणि संकलन : महेश एलकुंचवार

किंमत : ₹ २२०/- । (ट.ख. ₹ ५०)



अभिनंदन!

## लोकमत साहित्य पुरस्कार
## २०२४चे ‘राजहंसी’ मानकरी



दस्तावेज
पुरस्कार

**चंद्रकांत कुलकर्णी**
**सादर करीत आहे...**

◆

चंद्रकांत कुलकर्णी




---



मांडणी पुरस्कार

**वस्त्रगाथा**

◆

विकास गायतोंडे




---



लक्षणीय पुरस्कार

**अभिषेकी**

◆

शैला मुकुंद



# वसा अक्षर चळवळीचा

‘वाचाल तर वाचाल’ हा मंत्र समाजाला कृतीतून दर्शविणाऱ्या समाजमाध्यमांवरील प्रेरक समूहांची माहिती

## आम्ही (सातारकर) पुस्तकप्रेमी समूह

वाचन चळवळ वाढावी, ‘समानधर्मी’ मित्रमैत्रिणींनी एकत्र यावे ह्या हेतूने अनेक समूह आजकाल व्हॉट्सॲपवर किंवा फेसबुकवर स्थापन झालेले आहेत. अशाच एका ‘पुस्तकप्रेमी’ समूहाचा मी सभासद झालो, त्या समूहातील सदस्यांचे ग्रंथप्रेम आणि वाचनाचा आवाका बघून मी थक्क झालो. ठरवले की असाच एखादा समूह आपण सातारकर पुस्तकप्रेमींसाठी सुरू करायचा. त्यातूनच स्फूर्ती घेत आम्ही सातारकर साहित्यप्रेमी मंडळींनी ‘वाचू आनंदे’ हा उद्देश ठेवून हा समूह २३ ऑगस्ट २०२१ रोजी स्थापन केला. काही दिवसांतच त्याचा प्रसार सातारा जिल्ह्याच्या सीमा ओलांडून थेट परदेशातदेखील गेला. अर्थात सातारा जिल्ह्याशी नाळ न तुटलेली मंडळी बहुसंख्येने एकत्र जमली.

लेखक लिहीत असतो आणि वाचक वाचत असतो. लेखक आणि वाचक यांचे नाते एखाद्या लंबकासारखे असते. वाङ्मय संस्कृतीमधील ह्या लंबकाची दोन्ही बाजूंची टोके म्हणजे लेखक आणि वाचक आहेत. परंतु त्यादरम्यान संपादक, प्रकाशक, वितरक आदी मंडळी असतात. लहानमोठी ग्रंथालये असतात. लेखक आपल्या हातून लिहिलेले लेखन ‘पुस्तक’रूपाने ह्या लंबकामध्ये सोडतो, वाचक ते वाचून लंबक पुन्हा लेखकाच्या दिशेने टोलवतो, त्याच प्रतिक्रियांची लेखक अधाशीपणे वाट बघत असतो! पण ह्या सर्व प्रक्रियेमध्ये सर्वांत महत्त्वाचा असतो तो वाचक. ‘यथा राजा तथा प्रजा’ ह्या धर्तीवर ‘यथा वाचक, तथा लेखक’ असे म्हणावेसे वाटते. सकस साहित्यनिर्मिती होण्यासाठी कठोर आणि साक्षेपी वाचक तयार व्हायला हवा. आमच्या समूहस्थापनेचा हा एक मोठा उद्देश आहे!

पुस्तके वाचकाला घडवतात, बिघडवतात दोन्ही खरे आहे; परंतु एक सत्य मात्र आहे की, जगात जेवढे लोक उपासमारीने मेलेत त्यापेक्षा जास्त लोक पुस्तक न वाचल्यामुळे मेलेत. पुस्तकातून ज्ञान आणि ज्ञानातून संपत्ती निर्माण होत असते. प्रसंगी अखंडित वाचीत जावे, हेच खरे.

वाचन असेल तर विचार येतात, विचार आले की स्वातंत्र्य येते, स्वातंत्र्य आले की स्वाभिमान येतो आणि त्यानंतर वैभव येते. ह्या साहित्यसागरामध्ये इतके

प्रचंड वाङ्मय आहे, इतकी विषयविविधता आहे की, त्यांचा आस्वाद घ्यायला शेकडो मनुष्यजन्म एका व्यक्तीला पुरणार नाहीत. मग त्यावर तोडगा काय? त्यावर पुस्तकप्रेमींनी एकत्र येणे हा मोठा उपाय! आपापल्या आवडीची पुस्तके निवडावीत, त्यांची मोजक्या शब्दांत सुयोग्य ओळख इतरांना करून द्यावी, इतरांनी त्याच विषयावर आपली मते लिहावीत, भले ती इतरांना पटणारी असो अथवा नसोत, व्यक्त होणे महत्त्वाचे. आपल्याजवळचा ग्रंथसंग्रह हीच आपली संपत्ती असते, तिचे योग्य प्रदर्शन म्हणजे आमचा हा समूह.

हा समूह आता तीनशे सदस्यांना सामावून घेत मोठा झाला आहे, त्यामध्ये लेखक, कवी, संपादक आणि वाचक मंडळी आहेत. ह्या समूहात रोज सकाळी सात वाजता एक पुस्तक-परिचय पोस्ट केला जातो. फक्त त्याच पुस्तकाचा विषय आणि लेखकाबद्दल चर्चा दिवसभर चालते. एक परिचयकर्ता सलग एक आठवडा सात पुस्तक-परिचय लिहितो. आजपर्यंत (मार्च २०२५) असे गेली १९० आठवडे अखंड चालू आहे. १९००पेक्षा जास्त पुस्तक-परिचय आजपर्यंत करून दिले गेले आहेत.

अर्थात कोणत्याही संस्थेला, समूहाला काही नियम पाळावे लागतात. त्याशिवाय सुसूत्रता येत नाही. एका व्यक्तीला सलग सात दिवस सात पुस्तक-परिचय करायला संधी देणे, हे त्या व्यक्तीचे वाचन किती समृद्ध आणि वैविध्यपूर्ण आहे, ह्याचे द्योतक असते. दररोज वेगळ्या व्यक्तीने पुस्तक-परिचय लिहिणे, हे सहज शक्य असले तरी ती त्या व्यक्तीच्या ग्रंथप्रेमाची सर्वांगीण ओळख होऊ शकत नाही.

दुपारी दोन वाजेपर्यंत त्या दिवशीच्या पुस्तकाच्या अनुषंगाने चर्चा व्हायला हवी, हे त्या परिचयकर्ता तसेच लेखकाला आणि पुस्तक-विषयाला द्यायचा सन्मान असतो.





त्याचा स्वर लोकमान्य टिळकांच्या कानी पडला आणि तो 'नारायण राजहंस'चा 'बालगंधर्व' झाला. त्याच्या संगीताच्या अमृतधारांत महाराष्ट्राच्या दोन पिढ्या आनंदल्या. त्याच्या जीवनाच्या काळ्या छाया पाहून त्या हळहळल्या. संगीत-नाटक हा त्याच्या जीवनाचा ध्यास होता. त्याचं जीवन एक शोकान्त नाटक झालं. हे सारं कसं, केव्हा घडत गेलं, ते कथन करणारी चरित्र कादंबरी.

असा बालगंधर्व...

अभिराम भडकमकर

आवृत्ती पाचवी । किंमत : ₹ ४५०/- । (ट.ख. ₹ ५०)

म्हणून हा नियम. त्यानंतर उर्वरित दिवसामध्ये फक्त साहित्यविषयक उपक्रम यांच्या बाबतीत पोस्ट असाव्यात, त्यामध्ये कोणताही वैयक्तिक प्रचार, प्रसार आणि धर्म-जात-राजकारण ह्यांचा एकांगी अतिरेकी विचार नसावा, ही महत्त्वाची अट आहे. ती कटाक्षाने पाळली जाते.

गेल्या साडेतीन वर्षांत आमच्या समूहात अनेक सदस्य आपणहून आले. एकाला दुसरा जोडला गेला आणि 'कारवा बनता गया'! लवकरच ह्या समूहामध्ये मोबाईलवरील पुस्तक-परिचय चर्चेशिवाय अनेक उपक्रम सुरू केले. 'म.सा.प, पुणे'चे कोषाध्यक्ष विनोद कुलकर्णी, पुणे शाखेचे प्रतिनिधी शिरीष चिटणीस आणि जनवाचक चळवळीचे श्रीराम नानल यांच्या सहकार्याने आम्ही अनेक उपक्रम 'आम्ही पुस्तकप्रेमी' समूहातर्फे सुरू केले. त्यामध्ये 'लेखक तुमच्या भेटीला', 'साहित्यिक गप्पा', 'ग्रंथ प्रदर्शन', 'पुस्तक आदान-प्रदान', 'दिवाळी अंक परिचय', 'चित्रपट रसग्रहण', 'नाट्य रसग्रहण', 'कविता रसग्रहण', 'वार्षिक स्नेह (साहित्य) संमेलन', साहित्यिकांची जयंती आणि पुण्यस्मरण असे दिनविशेष इत्यादी विविध कार्यक्रम (काही प्रत्यक्ष, काही आभासी) स्वरूपात घेतले जातात. त्यामध्ये आजवर डॉ. सुनील कुमार लवटे, शरद तांदळे, अश्विनी धोंगडे, गौरी देशपांडे, दिलीप कुलकर्णी, दीपक करंजीकर, माधव जोशी, चंद्रशेखर टिळक, मुकुंद फडके, श्रीकांत कात्रे अशा कितीतरी साहित्यिकांनी भाग घेतला आहे.

ह्यासाठी आम्हाला सातारा येथील दीपलक्ष्मी पतसंस्थेचे वातानुकूलित सभागृह शिरीष चिटणीस यांनी विनामूल्य उपलब्ध करून दिले. सातारा शहराचे थोरले प्रतापसिंह महाराज नगर वाचनालय यांचेदेखील सहकार्य असते. सातारा शहरात आजपर्यंत आमची दोन स्नेहसंमेलने उत्साहात पार पडली.

आणखीन एक फायदा असा झाला की, मान्यवर साहित्यिकांची आणि त्यांच्या कलाकृतींची ओळख करून देताना आमच्या समूहातील कित्येक सदस्य लिहायला लागले, त्यांच्या स्वत:च्या साहित्यकृती प्रकाशित होऊ लागल्या. मोठ्या साहित्यिकांची ओळख होता होता आमच्यामधील दडलेले साहित्यिक आता प्रकट होऊ लागले!

शेवटी समर्थांच्या ओवीमध्ये बदल करून, असे म्हणता येईल,

'जे जे आपण वाचिले, ते ते वर्णावे ऐसे,<br>
सहयात्री करोनि सोडावे, सकल वाचक.'

***डॉ. संदीप गजानन श्रोत्री***

९८२२०५८५८३

अभिनंदन!

## तिसरे अनुवादक संमेलन, नांदेड



स्व. सुनील मेहता यांच्या स्मृतिप्रीत्यर्थ
लेखन, संपादन, अनुवाद, अध्यापन आणि
व्यवस्थापन क्षेत्रातील भरीव योगदानाबद्दल
जीवनगौरव पुरस्कार

◆

शिरीष सहस्रबुद्धे

अभिनंदन!

## आयबीएन लोकमत समूह



चार दशकं मराठी वाचकांना
समृद्ध करत साहित्य क्षेत्रातील विशेष
योगदानाबद्दल
मुक्ता जीवनगौरव पुरस्कार

◆

वीणा गवाणकर

अभिनंदन!

## आरंभ ऑटिझम सेंटर, संभाजीनगर



जागतिक महिला दिनानिमित्त
आरंभ - सक्षम पुरस्कार

◆

राजेश्वरी किशोर

*हजारो वर्षांच्या परंपरेचं पाथेय आपल्या अक्षर वाङ्मयातून पुढील पिढ्यांना देणारी, संस्कारशील असूनही आपलं स्वयंभूपण आणि मूलकंद जपणारी आपली मातृभाषा मराठी अनेक वर्षांच्या प्रयत्नांनंतर या वर्षी घटस्थापनेच्या मुहूर्तावर अभिजात भाषांच्या पंक्तीत विराजमान झाली आहे. मायमराठीच्या समृद्ध ठेव्यातील भाषेची सौंदर्यस्थळे व सामर्थ्यस्थळे अंशरूपाने वाचकांसमोर ठेवणारे हे सदर. अखेर 'पिंडी ते ब्रह्मांडी...'*

'सहजतेतील, उत्स्फूर्ततेतील सुंदरता' हा भाषाविशेष ज्यांनी जपला अशा 'पुलं'चे हे जागतिक मराठी परिषदेतील भाषण...

माझ्या मराठी मित्रांनो,

मी कधीही घेतलेला नव्हता अशा एका भावनेचा अनुभव घेतोय की मी संकोचलोय. संकोच हा काही माझा स्थायिभाव नाहीय. आमचे सोपानदेव म्हणायचे की, कोणाच्या घरी कोच पाह्यला की मला संकोच वाटतो बसायला. तो काय असतो याचा अनुभव मला आज आला. इतक्या परमप्रतापी लोकांमध्ये बसताना मला अवघडल्यासारखं झालेलं आहे. मला सारखी शेक्सपिअरची एक ओळ आठवतेय. त्यानं म्हटलं होतं, 'Some are born great. Some achieve greatness...' आणि बाकीच्यांचं ग्रेटनेसशी throust on some. त्या पहिल्यामध्ये शिवाजी महाराजांसारखे born great असतात. त्याच्यानंतर लोकमान्य टिळकांच्यासारखे achive greatness केलेले असे असतात आणि तिसऱ्या कॅटेगरीमध्ये माझ्यासारखे असतात कुणीतरी की... throust on some. त्याचा अनुभव अतिशय चांगला आला आत्ता मला. मी ज्यांच्यातर्फे आभार मानावे असं सांगितलं, ती माणसं इतकी पराक्रमी नि इतकी मोठी आहेत की, त्यांच्या वतीनं उभं राहणं हाच मला माझा सगळ्यांत मोठा गौरव आहे असं वाटतं. इथे बसलेली सगळी माणसं खूप मोठी आहेत. मी त्यांचं वर्णन करत बसणार नाही. पण इथं लता बसलीय. मला जर कुणी विचारलं की आकाशात देव आहे का? तर मी म्हणेन... मला माहीत नाही. या आकाशामध्ये सूर्य आहे, चंद्र आहे

आणि लताचा स्वर आहे. दिवस-रात्र कुठली अशी वेळ नाही, क्षण नाही की लताचा स्वर या जगात कुठूनतरी कुठेतरी जात येत नाही. अशी लता मंगेशकर इथे बसलीय. पलीकडे ज्यांना मी गुरुतुल्य मानतो, माझ्या नाट्यसृष्टीमध्ये... ते मो. ग. रांगणेकर बसलेले आहेत. बापटनं सांगितलं की, त्यांच्या कंपनीत मी होतो. त्याला त्यांचा नाइलाज आहे. सांभाळून घेण्याची त्यांची पहिल्यापासूनची वृत्ती आहे. तसं त्यांनी मला सांभाळून घेतलेलं आहे. मी मात्र अभिमानानं सांगत असतो की, मी नाट्यनिकेतनमध्ये होतो. असा अभिमान मला ज्यांच्यामुळे मिळाला असे हे लोक आहेत. इथे जी तेजस्वी मंडळी आहेत... आमचे राजारामबापू आहेत. १०३ वर्षांचा तरुण मनुष्य असं त्यांचं वर्णन केलं होतं. त्यांच्याइतका उत्तम गोंधळ राजकीय माणसालासुद्धा घालता येत नाही हे तुम्हाला सांगतो. आजची हजर माणसं राजकीय म्हणून जमलेली नाहीयेत हे मला माहित्येय म्हणून मी हे बोलण्याचा धाष्टर्य केलं. नाहीतर आपण सहसा कुणाला दुखवत नाही; सत्तेच्या माणसाला तर नाहीच.

त्यानंतर आपण नेहमी म्हणतो विद्वत्ता म्हणजे प्रखर तेजस्वी, जळजळीत वगैरे. परंतु ज्यांच्या विद्वत्तेमध्ये शारदीय चांदण्याच्या आनंद आपल्याला लाभतो असे आमचे लक्ष्मणशास्त्री जोशी आहेत. विद्वत्ता ही किती शीतल आणि सुंदर असू शकते असं जर कोणी मला विचारलं तर मी सांगेन की, तुम्ही लक्ष्मणशास्त्री जोशींच्या सहवासात एक तास घालवा म्हणजे तुम्हाला चांदण्यात न्हाऊन निघाल्यासारखं वाटतंय की नाही ते बघा. नाही वाटलं तर तुम्ही जन्मजन्मांतरीचे गलिच्छ आहात असं समजा आणि जा. असा शापसुद्धा देव काही लोकांना देत असतो. त्यानंतर शांताराम बापूंबद्दल मी काय सांगू? 'वार्धक्यातही पर्वते सर म्हणती' असं त्यांचं कर्तृत्व आहे. ही अशी सगळी माणसं इथं बसलेली असताना मी आभाराला शब्द कुठून आणू? हे मला खरोखरच माहीत नाही. एक तर आभार, धन्यवाद वगैरे मराठी शब्द नाहीत. कोणाच्या घरी तुम्ही गेलात, पिठलंबिठलं खाल्लंत, चांगलं जेवलात नि तुम्ही 'तुमचा आभारी आहे' असं म्हटलंत तर महाकृत्रिम, निव्वळ नाटकी मनुष्य आहे असं समजावं. अहो, आम्हाला नाटकाची इतकी सवय आहे की, पाय धरून नमस्कार केला तरी बापटला वाटलं की हा अभिनय नाही हे लोकांना सांगावं. पण बापटांना मला हे सांगावंसं वाटतं की, आज जगामध्ये पाय धरावे असे पाय मिळत नाहीत, ते लाभले तर ते धरले तर काय चुकलं. इथे उद्योगपती शंतनुराव किर्लोस्कर आहेत. यमुनाबाई वाईकर आहेत. तुम्हाला सांगतो की, लावणी गाणं म्हणजे सामान्य आहे असं समजू नका. एकेक वजन पेलताना त्याला रक्त आटवावं लागतं आणि त्याची समज, जाणीव आत करून घ्यावी लागते. जितकी ख्यालाला करून घ्यावी लागते; तितकीच लावणी गातानाही करून घ्यावी लागते. हा साक्षात्कार ज्यांच्या गाण्यांमध्ये आज अनेक वर्षं झाला त्या यमुनाबाई इथे आहेत. इथे गोवारीकर आहेत. अहो, हवामानतज्ज्ञ असूनसुद्धा यांचा हवामान अंदाज बरोबर आला!

मी थक्क झालो! म्हणजे हल्ली पाऊस कोणाचं ऐकत नाही; पण यांचं ऐकतो की काय असं मला वाटायला लागलंय. कारण आमच्या पुण्याचा हवामानतज्ज्ञ 'the poona climate does'nt agree with me' म्हणून सोडून गेला होता. तर अशा प्रकारची परमपराक्रमी माणसं बसलेली असताना मी काय आभार मानायचे. मला तर एवढंच वाटतं की, मराठी संस्कृतीत, भारतीय संस्कृतीत जिथे आभार मानत असतील ते मानू देत बिचारे! मराठी माणसाला ते आभार मानतो, धन्यवाद देतो असं म्हटलं की हा खोटंच बोलतोय असं वाटतं. किंबहुना मराठी माणसाला फार हळू बोलायला लागलं तरी हा ढोंगी आहे असं वाटतं. इतके आपण मोठ्यानं बोलत असतो एकमेकांशी. मोकळेपणानं बोलत असतो. या लोकांनी आम्हाला अतिशय सुंदर भेट दिलीय. तो लामणदिवा आहे. मी एवढंच सांगतो की, हा लामणदिवा सगळ्यांच्या घरी सदैव, निश्चित पेटत राहील. फक्त तेवढे तेलाचे भाव खाली आले तर बरं होईल. एके काळी या महाराष्ट्रात ज्यांच्या घरी अत्तराचे दिवे जाळत असत असं म्हणतात, अलीकडे गोडेतेलाचे दिवे जाळणारे लोकं आहेत काय असं बोलायची पाळी आलीय. तेव्हा तेवढे नक्की येतील. पण आमच्या अंत:करणात दुसरा जो दीप त्यांनी लावलाय... तो स्नेहदीप आहे. त्याची जी ज्योत आहे ती आमच्या प्राणज्योतीबरोबरच मालवली तर मालवेल. तोपर्यंत ती चैतन्यानं युक्त अशी राहील एवढं मी सांगतो. मला माहीत नाही की हा मान स्वीकारायला मी योग्य आहे की नाही; परंतु इतक्या लोकांनी ज्या अर्थी मी मोठा आहे असं ठरवलंय, तर कदाचित असेनसुद्धा अशी शंकासुद्धा माझ्या मनात यायला लागली आहे. तिचं निरसन माझ्या कर्तृत्वानं लवकरच झाल्याशिवाय राहणार नाही हे मलाही माहीत आहे. आपण एवढं प्रेम केलंत, घरच्या माणसांनी घरचा आहेर (याला मराठीत निराळाच अर्थ आहे!) दिला.

आयुष्यभर कुठल्यातरी एका क्षेत्रात धडपडून, ते समजून घेण्याचा प्रयत्न करताना इतका सुंदर आहेर मिळालाय. हा एक मोठा महत्त्वाचा प्रसंग आहे. आयुष्यभर आजन्म लक्षात राहावा असा आहे. त्या प्रसंगाला आपण केवळ मराठी नावाच्या भावनेनं जमलेलो सगळे एकत्र आलेलो आहोत. आपल्या सर्वांच्या साक्षीनं हा सन्मान मिळावा यासारखा गौरव नाही. ज्याला आपल्या भाषेवर प्रेम करता आलं त्यालाच दुसऱ्याच्या भाषेवर प्रेम करता येतं असं मला वाटतं. आपल्या आईवर जो प्रेम करतो, त्याला मातृत्व म्हणजे काय, वात्सल्य म्हणजे काय ते कळतं. आपल्या भाषेवर प्रेम करणारी माणसं ही जगातल्या सर्व भाषांवर प्रेम करतात. दु:स्वास कुणीही करत नाहीत. दु:स्वास ही निराळीच भावना आहे. इथं अभिमानानं आपण म्हटलं की, हो... मी मराठी आहे! मला नेहमी मराठी आहे असं म्हणताना वाटतं की शिवाजी महाराजदेखील कधीतरी सोयराबाईंना म्हटले असतील की, आजचं पिठलं काही जमलं नाही बरं का! मराठीत सांगत असतील. मला खूप बरं वाटतं की थोर माणसं मराठीत बोलतात. अशा थोर माणसांनी जी भाषा समृद्ध केली त्यातलेच आपण एक लहानसे

आहोत, बाकीची मंडळी मोठी आहेत. त्या मानानं मी लहानसा असूनसुद्धा तुम्ही मला मोठं केलंत. हे महाराष्ट्र धर्माला जागलात की नाही हे मला माहीत नाही. नाहीतर आपल्याकडे सामान्यत: मोठा मनुष्य असला तरी हो ठीकय... वगैरे! नाहीतर चढून जाईल अशा प्रकारची एक आपल्याला भीती असते. आम्ही आता अशा वयात आलोयत की, आता चढून जायचं असेल तर कोणाच्यातरी खांद्यावरच चढून जाणार! त्यामुळे ही भीती बाळगायचं काहीही कारण नाही. आपण हा जो सन्मान केलात त्याबद्दल मी आपल्या सर्वांचे मनापासून आभार मानतो आणि धन्यवाद देतो. कारण माझ्याकडे दुसरे शब्द नाहीत बोलायला. एवढंच सांगतो की, आयुष्यातले जे अत्यंत आनंदाचे, कृतज्ञतेचे, सहृदयतेचे क्षण आहेत त्यातला हा एक क्षण आहे. तो शब्दांनी व्यक्त करण्यासारखा नाही आणि जे शब्दानं व्यक्त करण्यासारखं असतं ते फारसं सांगण्यासारखं नसतं असं मला वाटतं. तर असा हा अनिर्वचनीय अनुभव दिल्याबद्दल मी पुन्हा एकदा आपले आभार व्यक्त करतो नि थांबतो. धन्यवाद.

❖

तब्बल सहा दशकांचा काळ मराठी मनाला
मनसोक्त रिझवणारा... हा अष्टपैलू प्रतिभावान
असंख्य मराठी मनांचा एक कप्पा कायमचा व्यापून
बसला आहे! पुलंना शोभेशा शैलीत घेतलेला वेध
पुलंच्या जीवनाचा, त्यांच्या काळाचा,
काळावर त्यांनी उमटवलेल्या अमीट नाममुद्रेचा!

पु.ल. : चांदणे स्मरणाचे

मंगला गोडबोले

आवृत्ती चौथी । किंमत : ₹ ४३०/- । (ट.ख. ₹ ५०)







हे आहे सुधीर फडके अर्थात बाबूजींचं अपुरं आत्मचरित्र!...
तरीही एका संगीतसाधकाचं विलक्षण व्यक्तित्व, त्याच्या सश्रद्ध -
सुसंस्कारित मनाचं स्वच्छ प्रतिबिंब दाखवणारं, खडतर
जीवनदर्शन घडवणारं हे आत्मचरित्र वाचायलाच हवं...

जगाच्या पाठीवर

सुधीर फडके

आवृत्ती तेरावी । किंमत : ₹ ४००/- । (ट.ख. ₹ ५०)

# असे जन्मले पुस्तक

## हिंदुत्व, मार्क्सवाद आणि भारत

*स्वामी विवेकानंदांनी म्हटले आहे की, इतिहास माहीत असलेला माणूसच इतिहास घडवू शकतो. सध्याच्या कठीण परिस्थितीतून मार्ग काढण्यासाठी गेल्या शतकातील बऱ्या - वाईट गोष्टींची जाणीव असणे आवश्यक आहे. विस्तृत विवेचन आणि संदर्भमूल्य असलेले हे पुस्तक कालसुसंगत तर आहेच, पण भविष्यातही अभ्यासकांसाठी हे पुस्तक उपयुक्त ठरेल याचा मला विश्वास आहे.*

प्राचीन काळी माणूस इतर जनावरांप्रमाणे खाण्यासाठी फळे, मुळे गोळा करून किंवा खाण्यायोग्य प्राण्यांना मारून पोट भरत असे. माणूस जेव्हा शेती करू लागला, तेव्हा त्याला एका जागी स्थिरावणे आवश्यक झाले आणि माणूस सामाजिक प्राणी झाला. शेतीसाठी लागणाऱ्या इतर गोष्टींसाठी इतरांशी व्यवहार करणे आवश्यक झाले, त्याचप्रमाणे समाजात राहण्यासाठी नीतिनियम ठरवणे आवश्यक झाले. परिणामी समाजातील विविध घटकांमधील वस्तू आणि सेवा यांच्या विनिमय आणि नियंत्रण यासाठी अर्थकारण आणि समाजात राहण्यासाठी लौकिक आणि पारलौकिक नियम सांगणारे धर्मकारण अस्तित्वात आले. आज हजारो वर्षांनंतरही सर्व जगात अर्थकारण आणि धर्मकारण या दोन बिंदूंच्या भोवती राजकारण आणि समाजकारण फिरताना दिसते.




किंमत : ₹ १०००/- । (ट.ख. ₹ ५०)

आपल्या देशाबद्दल बोलायचे झाल्यास अर्थकारणात डाव्या विचारांचा प्रभाव दिसतो. आज जरी भाजपा सत्तेत असला तरी रूढ अर्थाने (जसा एके काळी स्वतंत्र पक्ष होता तसा) तो उजव्या विचारसरणीचा नाही. भाजपासुद्धा असमानता, अन्याय आणि शोषणाच्या विरोधात आहे आणि कल्याणकारी राज्याची संकल्पना त्यांना मान्य आहे. श्री. गुरुजी आणि श्री. बाळासाहेब देवरस यांनीसुद्धा असे सूचित केले होते

की, मार्क्सवादाने आर्थिक संबंधात काही चांगल्या गोष्टी दिल्या आहेत. हे डावे विचार १९२५ साली स्थापन झालेल्या कम्युनिस्ट पार्टीने भारतात रुजवले.

धर्मकारणात देशात आज हिंदुत्वाचा प्रभाव आहे आणि देशाची बहुसंख्य जनता हिंदू असल्यामुळे ते स्वाभाविक आहे. परंतु दीर्घकाळ मुस्लीम आणि ब्रिटिश सत्तेखाली राहिलेले हिंदू त्यांचा आत्मविश्वास, ऐक्यभावना आणि स्वत्व गमावून बसले होते. डॉ. हेडगेवार यांनी १९२५ साली राष्ट्रीय स्वयंसेवक संघाची स्थापना केली आणि सकल हिंदू समाजाला एकत्र आणून त्यांच्या उन्नतीचे प्रयत्न सुरू केले.

हिंदुत्वाचे प्रतिनिधित्व करणारा राष्ट्रीय स्वयंसेवक संघ आणि मार्क्सवादाचे प्रतिनिधित्व करणाऱ्या विविध गटांमध्ये खंडित झालेला कम्युनिस्ट पक्ष यांचे हे शताब्दी वर्ष आहे. या काळात संघाच्या छत्राखाली समाजासाठी उपयुक्त अशा अनेक संस्था उभ्या राहिल्या, ज्यांचा संघ परिवार झाला, जो हिंदुत्वाचे प्रतिनिधित्व करतो. तसेच विविध कम्युनिस्ट पक्षांच्या छत्राखाली अनेक संस्था उभ्या राहिल्या, ज्यांचा मार्क्सवादी परिवार झाला, जो मार्क्सवादाचे प्रतिनिधित्व करतो. आज शंभराव्या वर्षीसुद्धा हे दोन्ही परिवार सक्रिय आहेत कारण कार्यकर्ते हे यांचे खरे वैभव आहे आणि त्यांच्या आधारावर हे परिवार उभे आहेत. या प्रदीर्घ कालावधीत या दोन्ही परिवारांनी आपल्या देशातील राजकारण, समाजकारण आणि अर्थकारण यांवर फार मोठा प्रभाव टाकला आहे. माझ्या पुस्तकाला ही पार्श्वभूमी आहे.

२०१५ सालाच्या अखेरीला माझ्या पहिल्या पुस्तकाच्या संहितेचे लेखन पूर्ण झाले होते. त्यामुळे मला भरपूर वेळ होता. त्याच्या आदल्याच वर्षी भाजपचे सरकार पूर्ण बहुमत प्राप्त करून केंद्रात सत्तेवर आले होते. त्याचबरोबर मार्क्सवादी पक्षांना जनतेने नाकारले होते. एरवीसुद्धा हिंदुत्ववादी परिवार हे स्वत:ला पुरोगामी समजणाऱ्या




अलौकिक प्रतिभावंत, विश्वशांतीचा प्रणेता,
दलितांचा कैवारी, सत्याचा सांगाती,
अविरत आत्मसंशोधक, अभिनव शिक्षणतज्ज्ञ...
असे अनंतमिती व्यक्तिमत्त्व होते
काउंट लिओ टॉलस्टॉय यांचे. या प्रतिभाशाली
महामानवाची ही जगावेगळी जीवनकथा...!

टॉलस्टॉय एक माणूस

सुमती देवस्थळे

आवृत्ती पाचवी । किंमत : ₹ ९००/- । (ट.ख. ₹ ५०)

वर्गाचा टीकेसाठी आवडीचा विषय होता. त्यामुळे डाव्या परिवाराचा पराभव जिव्हारी लागलेल्या लोकांनी हिंदुत्व परिवारावर जोरदार टीका सुरू केली. त्याच वेळी विजयी हिंदुत्व परिवारावर स्तुतिसुमनेही उधळली जात होती.

पुस्तकाच्या ब्लर्बवर लिहिल्याप्रमाणे माझे असे ठाम मत आहे की, कोणतेही अस्तित्व हे निखळ चांगले किंवा निखळ वाईट नसते. प्रत्येक अस्तित्वाचा काही उद्देश असतो. हा नियम या दोन्ही परिवारांनासुद्धा लागू होतो. हिंदुत्ववादी परिवाराने अनेक चांगली गोष्टी केल्या, पण आर्थिक मांडणी करण्यात आणि त्यांच्या काही जहाल सदस्यांना आवर घालण्यात ते अपयशी ठरले. जनतेमध्ये शोषण आणि अन्याय यांच्या विरोधात जागृती घडवणे आणि जमेल तिथे लढा उभारणे यात मार्क्सवादी परिवाराने यश मिळवले, पण हिंसा रोखणे आणि हातात सत्ता असलेल्या राज्यात उत्तम प्रशासनाचा आदर्श उभा करण्यात त्यांना अपयश आले. या सगळ्याचे निष्पक्षपाती विश्लेषण होताना दिसत नव्हते.

मी या सर्व गोष्टींची नोंद घेत होतो. मग माझ्या मनात विचार आला की आपणच या विषयावर लिहावे. या दोन परिवारांवर लिहिणे, हेच एक फार मोठे आव्हान होते. त्याबरोबर त्यांना आधारभूत असलेल्या तत्त्वज्ञानाचा विचार करणेही आवश्यक होते. तसेच त्यांच्या वाटचालीचा विचार करताना त्या अनुषंगाने देशाच्या वाटचालीचा विचार करण्याचीही गरज होती. विषयाचा आवाका खूप मोठा होता. त्यासाठी ५-६ वर्षे तरी लागणार होती. त्याच वेळी माझ्या लक्षात आले की संघ आणि कम्युनिस्ट पक्षाला २०२५ साली शंभर वर्षे पूर्ण होतील आणि पुस्तकाच्या प्रकाशनासाठी ती चांगली संधी असेल. त्या निमित्ताने इतरही काही पुस्तके प्रकाशित होतील. पण त्या सर्वांत माझे पुस्तक निष्पक्षपाती आणि परिपूर्ण असेल यावर लक्ष केंद्रित करणे

दळवी खरे कसे होते?
हा आहे त्यांना जाणून घेण्याचा प्रयत्न. त्यांच्या पूर्वायुष्यातील काही घटनांमधून. साहित्यात प्रतिबिंबित झालेल्या त्यांच्या व्यक्तिगत अनुभवांतून. त्यांच्या पत्रव्यवहारांतून. मित्रमंडळी आणि नातेवाइकांशी झालेल्या संभाषणातून. आणि खुद्द दळवींशी झालेल्या गप्पागोष्टींमधून...!



जयवन्त दळवींविषयी...

मंगल आठलेकर

किंमत : ₹ १८०/- । (ट.ख. ₹ ५०)

आवश्यक होते. शेवटी २०१६ साली माझे पहिले पुस्तक प्रकाशित झाल्यावर मी हे पुस्तक लिहिण्याचे ठरवले.

हे पुस्तक लिहिण्यासाठी मी इंग्लिश आणि मराठी भाषेतील खूप पुस्तके वाचली, तसेच इंटरनेटवर उपलब्ध असलेले अनेक लेख वाचले. काही जणांशी चर्चा केली, ज्याची नोंद पुस्तकाच्या प्रस्तावनेत केली आहे. मराठी व्याकरण आणि इतर बाबतीत पत्नी सुनीतीने केलेलं साहाय्य वगळता मी हे पुस्तक इतर कोणत्याही मदतीविना पूर्ण केले. त्यानंतरच्या संपादन, सजावट, मुद्रण, प्रकाशन, वितरण या सर्व बाबी राजहंस परिवाराने समर्थपणे हाताळल्या. स्वामी विवेकानंदांनी म्हटले आहे की, इतिहास माहीत असलेला माणूसच इतिहास घडवू शकतो. सध्याच्या कठीण परिस्थितीतून मार्ग काढण्यासाठी गेल्या शतकातील बऱ्या - वाईट गोष्टींची जाणीव असणे आवश्यक आहे. विस्तृत विवेचन आणि संदर्भमूल्य असलेले हे पुस्तक कालसुसंगत तर आहेच, पण भविष्यातही अभ्यासकांसाठी हे पुस्तक उपयुक्त ठरेल याचा मला विश्वास आहे.



***विजय आपटे***
९८२०७४३२२०




हिंदुत्व परिवार व मार्क्सवादी परिवार शतकपूर्तीच्या उंबरठ्यावर उभे आहेत. त्यांच्या तत्त्वज्ञानाचा, कार्याचा तसेच गेल्या १०० वर्षांतील भारताचे समाजकारण आणि राजकारण यांच्यावर झालेल्या त्यांच्या परिणामांचा तटस्थ व निष्पक्षपाती भूमिकेतून घेतलेला हा मागोवा.

हिंदुत्व, मार्क्सवाद आणि भारत
(१९२५-२०२४)
शतकातील राजकीय घटनांचा धावता इतिहास

विजय आपटे

किंमत : ₹ १०००/- । (ट.ख. ₹ ५०)

# आठवणींचा पारिजात

## शल्य हे सलते उरी!

आपली इच्छा असो वा नसो, जीवनात असे काही प्रसंग घडतात, की त्यामुळे आपल्यावर निरपेक्ष प्रेम करणारी माणसे दुखावली जातात, आपल्याशी अबोला धरतात आणि त्याची चुटपुट आपल्या मनाला लावून जातात.

'झुंज बिबट्या वाघाची' ही तेरा भागांची मालिका दूरदर्शनसाठी दूरदर्शनवरील ज्येष्ठ अधिकारी आणि कलाकार याकुब सईद करीत होते. कोल्हापूरचे भास्कर जाधव यांची संहिता होती. जयराम कुलकर्णी, राघवेंद्र कडकोळ असे कलाकार त्यात प्रमुख भूमिकेत होते. मलाही त्यात मास्तरचीच भूमिका होती. विषय ग्रामीण जीवनाशी निगडित असल्यामुळे चित्रीकरणासाठी कोल्हापूरचा परिसर निवडला होता.

रगेल, रंगेल, विषयांध, कोणतेही पापकर्म करायला सरावलेला सरपंच आणि एक स्वाभिमानी, नेक स्वभावाचा मास्तर अशी ती झुंज होती. कथानकात सात्त्विक आणि दुष्ट प्रवृत्तीची माणसं थोडीशी भडक रंगात रंगवलेली. सात्त्विक, निर्भीड, सत्यशील प्राथमिक शिक्षकाची भूमिका ज्येष्ठ कलाकार जयराम कुलकर्णी करीत होते आणि उन्मत्त, कामांध आणि कपटी सरपंचाची भूमिका ज्येष्ठ कलाकार राघवेंद्र रंगवत होते.

माझ्याकडे भूमिका प्राथमिक शिक्षकाचीच होती, पण हा मास्तर कसा? तर सरपंचाचा एक नंबरचा चमचा! त्याच्या प्रत्येक कृतीत सहभागी होणारा, विड्या फुंकणारा, दारू ढोसणारा आणि सरपंचाच्या ठेवलेल्या बाईकडे जाऊन मजा मारणारा, एक नंबरचा लाचार, भेदरट इत्यादी इत्यादी.

माझ्यातल्या अभिनेत्याला हे एक प्रकारचं आव्हानच होतं. मी ते स्वीकारलं आणि माझ्या कुवतीप्रमाणे रंगवण्याचा प्रयत्न केला.

दूरदर्शनवर आठवड्याला ठरावीक दिवशी, ठरावीक वेळी त्याचं प्रसारण सुरू झाले आणि मी एके दिवशी अगदी वेगळाच अनुभव घेतला...

डेक्कन जिमखान्यावरील विमलाबाई गरवारे प्रशालेत बापट नावाचे शिक्षक होते. स्वच्छ पांढरे दुटांगी धोतर, तसाच पांढरा शर्ट, गोरापान रंग, घारे डोळे, चश्मा, बेताची उंची, पण प्रसन्न चेहरा असं त्यांचं व्यक्तिमत्त्व! त्यांचा माझा चांगलाच परिचय. उत्कर्ष बुक डेपोमध्ये त्यांची अधूनमधून भेट व्हायची. उत्कर्षचे सुधाकर जोशी हे त्यांचे आणि माझे उत्तम स्नेही, त्यामुळे भेट झाल्यानंतर इतर बोलणं व्हायचं. बाळासाहेब (माझे मोठे बंधू) कसे आहेत, पुण्याला कधी येणार आहेत, अशी घरगुती चौकशीही व्हायची.

एके दिवशी उत्कर्षमध्ये सकाळच्या वेळी त्यांची माझी नजरभेट झाली. म्हणजे मी दुकानात शिरत होतो आणि ते बाहेर पडत होते. पण माझ्याशी एक शब्दही न बोलता ते तरातरा निघून गेले. मनाशी विचार केला, ‘काही विशेष कामात व्यग्र असतील, म्हणून लक्ष नसेल गेले.’ - असो.

- पण वारंवार तीनचार वेळा हाच प्रकार घडला. मग मीही जिद्दीलाच पेटलो. एके दिवशी त्यांनी माझ्याकडे पाठ फिरवताच मी त्यांच्यापुढे जाऊन उभा राहिलो आणि सरळ प्रश्न विचारला, ‘‘बापट सर, मी रानडे. गेले काही दिवस तुम्ही माझ्याशी बोलणं बंद केलंय. माझं काही चुकलंय का?’’

‘‘एक शब्द बोलू नका. तुम्ही स्वत: शिक्षक आहात ना? मग शिक्षकांचीच बदनामी तुम्ही कशी काय करू शकता?’’

‘‘शिक्षकांची बदनामी? मी? ती कशी काय?’’

‘‘काय ती तुमची मालिका आणि त्यातली तुमची ती नीच मास्तराची भूमिका? बिड्या काय फुंकता, दारू काय पिता, बाईकडे काय जाता आणि त्या सरपंचाच्या नीच कृत्यांत सामील काय होता - आणि खुनात सामील? अशी भूमिका करताना तुम्हाला लाज कशी वाटली नाही?’’ बापट सरांनी माझ्यावर शब्दांचा भडिमार केला आणि गर्रकन वळून ते तरातरा निघूनही गेले. मी त्यांच्या पाठमोऱ्या, तरातरा चालणाऱ्या आकृतीकडे केवळ बघतच राहिलो. त्यांना लगेच भेटून मी काही समजावण्याचा प्रयत्न केला नाही. काच तापलेली आहे. पाणी मारून थंड करण्याचा प्रयत्न केला, तर तडकायची... हळूहळू थंड करणं हेच योग्य!

नेहमीच्या जीवनातला, रोजच्या जगात वावरणारा माणूस आणि नाटक-सिनेमा-दूरदर्शन यांत भूमिका करताना वाट्याला आलेली व्यक्तिरेखा रेखाटताना एक कलाकार





श्री. पु. भागवतांच्या नेतृत्वाखाली ‘मौज’ साप्ताहिक, ‘सत्यकथा’ मासिक आणि ‘मौज प्रकाशनगृह’ यांनी वाङ्मय आणि कला या क्षेत्रांत केलेल्या कार्याचे व श्री.पुं.नी या तिन्ही विभागांत केलेल्या संपादनाचे स्वरूप वस्तुनिष्ठ भूमिकेतून तपासण्याचा प्रांजळ प्रयत्न.

वाङ्मयीन युगान्तर आणि श्री. पु. भागवत

संपादक : सुधीर रसाळ, वसंत पाटणकर

किंमत : ₹ ६००/- । (ट. ख. ₹ १००)

म्हणून वावरणारा माणूस यांत जमीन-अस्मानाची प्रचंड तफावत असते, हा फरक मी त्यांना कसा काय समजावून सांगणार? समजावून सांगायला, मतभेद व्यक्त करायला, संवाद साधायला समोर ती व्यक्ती तरी हवी ना?

त्यांनी माझं नाव टाकलं ते टाकलंच! आज ते या जगात नाहीत, पण अधूनमधून त्यांची आठवण येते. घडलेल्या प्रसंगाची बोच मनाला लागते. एका भल्या माणसाशी विनाकारण दुरावा निर्माण झाल्याचं शल्य उरी सलतं आणि मीच माझ्या मनाची समजूत घालतो आणि म्हणतो -

*माझ्यासारखा हौशी कलाकाराने*
*कोणी निंदा, कोणी वंदा*
*कलाकाराने जोपासावा अभिनयाचा धंदा...*


***श्रीराम रानडे***
९८२३१४४७०९





गेली चाळीस वर्षे दिलीप माजगावकरांनी विविध नामवंतांशी केलेला चिंतनशील व भावगर्भ पत्रसंवाद, त्यांची विस्तृत मुलाखत, तसेच 'दिगमा' या चतुरस्र व्यक्तिमत्त्वाला न्याहाळणारे त्यांच्या सुहृदांचे लेख...

पत्र आणि मैत्र

दिलीप माजगावकर

दिलीप माजगावकरांनी विविध प्रसंगी प्रकाशनासंबंधी, साहित्यकृतींविषयी केलेल्या अनुभवसिद्ध व रसाळ भाषणांचे संकलन आणि त्यांनी आंतरिक जिव्हाळ्याने रेखाटलेली अनेक सुहृदांची आशयसंपन्न व्यक्तिचित्रे...

वाणी आणि लेखणी

दिलीप माजगावकर



दोन पुस्तकांच्या संचाची किंमत : ₹ १०००/-
(ट.ख. ₹ १००)

## ‘राजहंसी’ विविधा



समीक्षकांपासून रसिकांपर्यंत, ‘पेन’सेनांपासून
‘कान’सेनांपर्यंत साऱ्यांना सहप्रवासी बनवणारी;
संगीताची नवी उमज आणि नवी समज करून देणारी
एक सांगीतिक यात्रा!

### गान गुणगान
एक सांगीतिक यात्रा

सत्यशील देशपांडे

आवृत्ती तिसरी । किंमत : ₹ ४५०/- । (ट.ख. ₹ ५०)

नेपोलियन, टॉलस्टॉय, कार्ल मार्क्स
यांच्यासारख्यांच्या सहचारिणी
आणि लेखिका एमिली ब्रांटे,
नोबेल पारितोषिक विजेत्या जेन ॲडम्स
यांच्यासारख्या स्वयंसिद्धा

### छाया आणि ज्योती

सुमती देवस्थळे

आवृत्ती तिसरी । किंमत : ₹ २५०/- । (ट.ख. ₹ ५०)






लहानपणापासून त्याला जगानं वेळोवेळी नाकारलं,
अडवलं. त्याला अनेक संकटांना तोंड द्यावं लागलं.
तरीही त्यानं संपूर्ण मानवजातीसाठी
अनमोल काम केलं.

### एक होता कार्व्हर

वीणा गवाणकर

आवृत्ती एकोणपन्नासावी । किंमत : ₹ २७०/- । (ट.ख. ₹५०)

# क... कवितेचा

मराठी मनाच्या सर्जनशीलतेला
पाऊलवाट देणारे सदर

## चैत्रफुलं

किती एक हालअपेष्टांनंतर
वाळल्या हातात ही चैत्रफुलं
आणि अवघ्या काळाचा
नुसता घमघमाट झालेला.

हे देहघर,
हा मनपरिसर
हे हृदयशिवार
इथून तिथून दरवळलेलं.

अन् आता ही
वाहत्या रक्ताची लाल हाक
तुझ्याच बहरपावलांचा
वेध घेत असलेली.

हा बहरच तर बाधा तुझी.
कारण आनंदाचा रंग
आता श्वासाश्वासावर पसरलेला.

***हेमकिरण पत्की***
९०८२५२२९६३

## समृद्ध वाचनानुभव देणारे ‘राजहंसी पुस्तकां’चे विश्वांगण



‘सायलेंट स्प्रिंग’ हे पुस्तक
म्हणजे जागतिक पर्यावरण चळवळीचा जन्म.
या पुस्तकातून साऱ्यांना पर्यावरणासंदर्भात
खडबडून जागे करणाऱ्या रेचेलची चरित्रकहाणी.

### आणि वसंत पुन्हा बहरला

लक्ष्मण लोंढे

आवृत्ती दुसरी । किंमत : ₹ १२५/- । (ट.ख. ₹ ५०)

अर्थशास्त्रामागील मानसशास्त्राचा
रंजक मागोवा घेणारे
चार्ल्स व्हीलन यांचे ‘नेकेड इकॉनॉमिक्स’
हे जगप्रसिद्ध पुस्तक आता मराठीत...

### स्वार्थातून सर्वार्थाकडे

चार्ल्स व्हीलन

अनुवाद : डॉ. अजय ब्रह्मनाळकर

किंमत : ₹ ४५०/- । (ट.ख. ₹ ५०)







‘सस्पेन्स मास्टर’ हे त्याला मिळालेलं योग्य बिरुद होतं,
पण त्याचं सर्व कर्तृत्व त्यात येत नाही.
हिचकॉक हा खरोखर ‘द मॅन हू न्यू टू मच’ होता.
याचा प्रत्यय देणारं पुस्तक...

### आल्फ्रेड हिचकॉक
### द मॅन हू न्यू टू मच

यशवंत रांजणकर

आवृत्ती तिसरी । किंमत : ₹ ३००/- । (ट.ख. ₹ ५०)

# उद्गार

## नियतकालिकांचे / समाजमाध्यमांचे अभिप्राय

### ओंजळीतील चाफा : सुगंधित ललित लेखन

*हे पुस्तक ललित-लेखांचं संकलन आहे. चिंतनशील, प्रेरक, मार्गदर्शक विचारांचे आरसे लेखकानं वाचकांपुढे उभे केले आहेत. त्यात रसरशीत चैतन्यमयी लालित्य आहे. लेखकाला काव्याची आवड असल्यानं अधूनमधून झिरपणाऱ्या काव्यपंक्तींच्या झऱ्यांनी हे लेख समृद्ध झाले आहेत.*

पुस्तकांचं वाचन कमी झालंय अशी तक्रार, कुरकुर सुरू असते. या पार्श्वभूमीवर आनंदाची बातमी म्हणजे इचलकरंजी येथील लेखक व वकील स्वानंद कुलकर्णी यांच्या 'ओंजळीतला चाफा' या पुस्तकाची तिसरी आवृत्ती हल्लीच प्रसिद्ध झाली आहे.

हे पुस्तक ललित-लेखांचं संकलन आहे. चिंतनशील, प्रेरक, मार्गदर्शक विचारांचे आरसे लेखकानं वाचकांपुढे उभे केले आहेत. त्यात रसरशीत चैतन्यमयी लालित्य आहे. लेखकाला काव्याची आवड असल्यानं अधूनमधून झिरपणाऱ्या काव्यपंक्तींच्या झऱ्यांनी हे लेख समृद्ध झाले आहेत.

मुळात आकाशवाणी मुंबईच्या चिंतन मालिकेसाठी त्यांनी लिहिलेले लेख व नंतर एका दैनिकात सगुण निर्गुण स्तंभासाठी लिहिलेले हे लेख आहेत.

ओंजळीतला चाफा हा मला शांत रसाचा संगीतमय ख्याल वाटतो. अमीर खाँच्या हंसध्वनीसारखा. स्वानंद म्हणजे आंतरिक आनंद. स्व-स्वरूपाचा आनंदकंद. लेखक आतील रसात डोहात, आकंठ बुडाला आहे. संस्कृती-सेवा, मानव-सेवा, ग्रंथवाचन, दया, करुणा, प्रेम, स्नेह या आईवडिलांच्या अनेक पिढ्यांच्या मूल्यांचा वारसा लेखक कटाक्षानं जपतो आहे. मंदिरात गेल्यावर तीर्थ प्राशन करताना आपण ते एका तळव्यावर घेताना दुसरा तळवा खाली धरून तीर्थाचा थेंबही खाली पडू नये याची काळजी घेतो. स्वानंदनं सद्गुणांचा वारसा असा जपला आहे.

हा लेखक म्हणजे जीवनाचा पूजक. जीवन सजवणं, त्यात गुणवत्ता भरणं, आनंद वाटणं व वाटण्याचा आनंद सेवन करणं यात रमलेला आनंदयात्री. दुरितांचं तिमिर दूर करायला सत् प्रकाशाच्या पणत्या, सात्त्विकतेची किरणं, सकारात्मकतेची फुलं हवीत.

स्वानंदच्या घरी सुंदर बाग आहे. सोनचाफ्याची व इतर फुलं बहरलेली आहेत. हा सुगंध तो भरलेल्या ओंजळीनं पुस्तकरूपानं वाटत आहे.

या लघुनिबंधांचा जीव तसा लहान; पण लेख आशयघन आहेत. 'कामाचा आनंद' या लेखात दैनंदिन विहित कार्याचा आनंद घेतला तर तो सुगंध पसरत जातो, असं लेखक सुचवतो. मी अमुक झालो असतो तर हे केलं असते या विचारांनी वर्तमान काळात जर आमची कामाची एकाग्रता भंगली तर ती पूर्ण सेवा होऊ शकत नाही, असं भाष्य तो करतो. 'अमृताचे फूल' निबंधात, फूल ही प्रतिमा त्याला किती आवडते याचा प्रत्यय येतो. पाषाणाला फुलं यावी, हा लेखही उत्तम आहे. संदर्भसमृद्धी हा पुस्तकाचा गुणविशेष होय.

आम्ही गाण्याचे झाड बांधतो, गंधित होऊन जगावे, जीवन त्यांना कळले हो, कैवल्याचा दीप असे अनेक सुरेख निबंध या पुस्तकात आहेत. ते वाचकाला अंतर्मुख करतात. स्वानंद वकील असूनसुद्धा कुठंही वकिली व्यवसायाचा वा बोजड संदर्भाचा लवलेशही पुस्तकात नाही. भाषेचा ओघ सुटसुटीत, प्रासादिक, साधा, लयदार आहे. जे जे चांगलं अनुभवलं, गवसलं, आकळलं, वाचलं ते वाचकांना सांगण्याचा मोह लेखकाला आहे व ते निरागसपणे सांगण्याची त्याची अलंकृत शैली लाजवाब आहे. त्यात शब्दांचे बुडबुडे, संदिग्धता, क्लिष्टता नाही.

साहित्य वाचनीयतेच्या निकषांखाली व्यवस्थित मांडलं तर ते जरूर वाचकांना आवडतं. लोकांपर्यंत भाषा, साहित्य, विचार पोहोचतात. मी माझ्या चोखंदळ वाचक मित्रांना हे पुस्तक भेट म्हणून दिलं. स्वानंदचं व राजहंस-पुणे प्रकाशनाचं अभिनंदन.

***मुकेश थळी***

(*लोकमत, गोवा आवृत्ती*, ८ फेब्रुवारी २०२५मधून साभार)





हे छोटेखानी लेख म्हणजे जणू सोनचाफ्याची फुलंच!
त्या फुलांचा सुगंध जसा मन मोहरवून टाकतो,
तसे हे लेखही सात्त्विक समाधान देणारे, चौफेर संचार
करणारे, प्रेरणेच्या पणत्या पेटवणारे आणि
भावविश्व समृद्ध करणारेही!

ओंजळीतील चाफा

स्वानंद मुकुंद कुलकर्णी

आवृत्ती तिसरी । किंमत : ₹ ३००/- । (ट.ख. ₹ ५०)

# पाकिस्तानचा अर्थ तरी काय?

पाकिस्तानविषयी भारतात नेहमीच एक वेगळी भावना असते. भारतापासून वेगळा झालेला हा देश कसा आहे, तिथे लष्कराचे वर्चस्व कशामुळे, तेथील जनतेला भारताबद्दल काय वाटते, असे प्रश्नही पडतात. त्यांची उत्तरे जाणून घेणाऱ्यांसाठी 'पाकिस्तान का मतलब क्या?' हे श्रीधर लोणी यांचे पुस्तक उपलब्ध झाले आहे. हे पुस्तक वाचनीय असून, त्यातील सर्वच प्रकरणे अभ्यासण्यायोग्य आहेत. आजकाल पाकिस्तान म्हटले की आपल्याकडे एकतर 'ते काय' अशा आविर्भावात बोलले जाते, किंवा पाकिस्तान निर्माण कोणामुळे झाला, त्याची कारणमीमांसा केली जाते. ती बहुतेक वेळा एकांगी किंवा प्रचारी असते. लोणी यांनी यांपैकी कोणाचीच री ओढलेली नाही. ते प्रत्येक गोष्टीच्या खोलात जाऊन त्याचा विचार करतात, त्याचे पैलू अभ्यासतात आणि लिहितात. त्यांनी या पुस्तकाची विचारपूर्वक रचना केली आहे.

आजचा पाकिस्तान कसा आहे, हे लोणी यांना तपासून पाहायचे आहे आणि एक चांगला (म्हणजे अर्थातच आपण) शेजारी म्हणून ते त्या देशाकडे पाहतात. पाकिस्तानी लष्कर आणि जिहादचे कारखाने याविषयी लिहितानाही ते आपला तोल जराही ढळू देत नाहीत. तेथील कट्टर धार्मिक अस्मिता, ईश्वरनिंदा कायदा, जिहादचे कारखाने या साऱ्यांबद्दल ते संयतपणे लिहितात. यांबद्दलची मांडणी करताना ते सत्याच्या पलीकडे जात नाहीत किंवा या परिस्थितीची तुलना अन्य कोणत्याही गोष्टीशी करत नाहीत.

पाकिस्तानी सत्तेने पूर्व पाकिस्तानात (आताच्या बांगलादेशात) केलेल्या अत्याचारांच्या अत्यंत घृणास्पद कहाण्यांबद्दल तेथील माजी पंतप्रधान इम्रान खान

पाकिस्तानचा इतिहास, संस्कृती, राज्यव्यवस्था, राजकारण, अर्थव्यवस्था, सामाजिक बांधणी आदींचा घेतलेला वेध; तसंच स्वतंत्र, सार्वभौम आणि एकसंघ राष्ट्र म्हणून पाकिस्तानचं भवितव्य काय असेल याविषयी केलेलं साक्षेपी विवेचन.

**पाकिस्तान का मतलब क्या?**

श्रीधर लोणी

किंमत : ₹ ४५०/- । (ट.ख. ₹ ५०)



यांनी १३ मे २०२३ रोजी त्यावर प्रथमच जाहीर टीका केली. या टीकेने ते लष्कराच्या मर्जीतून उतरले. याबाबत लोणी लिहितात, ‘भारताबरोबरील युद्धात निर्णायक पराभव झाल्याबद्दल पाकिस्तानात फारसे बोलले जात नाही. शालेय अभ्यासक्रमातही भारताने कारवाया करून पूर्व पाकिस्तानला वेगळे केले, असे शिकविले जाते. पूर्व पाकिस्तानातील बंगालींना मुख्य राष्ट्रीय प्रवाहाचा भाग न मानल्याने, त्यांची भाषिक अस्मिता डावलल्याने, त्यांना आपली वसाहत मानल्याने आणि सातत्याने त्यांचे शोषण केल्याने तिथे स्वातंत्र्याची चळवळ सुरू झाली आणि निवडणूक जिंकूनही सत्ता नाकारल्यानंतर निर्णायक संघर्ष सुरू झाला, हे पाकिस्तानात आजही सांगितले जात नाही.’ तिथे पुसत चाललेला इतिहास आपल्याही जनतेला सांगण्याची आवश्यकता आहे आणि लोणी यांनी ते केले आहे.

पाकिस्तानातील शक्तिशाली लष्कराबद्दल लोणी यांनी विस्ताराने लिहिले आहे. मुशर्रफ यांच्या राजवटीनंतर पाकिस्तानात लष्कर आणि मुलकी सरकार यांचे एक हायब्रीड मॉडेल विकसित झाल्याचे नमूद करताना ते आपला तटस्थपणा आणि आपली अभ्यासक दृष्टी सोडत नाहीत. पाकिस्तानातील राजकारण काश्मीर या एका विषयाभोवतीच जास्त फिरत असते. पाकिस्तान निर्माण झाल्यावर लगेचच काश्मीरमध्ये सैन्य घुसवून त्याचा कब्जा करण्याचा प्रयत्न पाकिस्तानने केला. त्यात ते काहीसे तोंडघशी पडले, पण त्यांनी ते प्रयत्न आजही सोडलेले नाहीत. त्यासाठी त्यांनी दहशतवाद्यांचा वापर सुरू ठेवला आहे.. काश्मीरविषयक ३७०वे कलम भारताने रद्द करताच पाकिस्तानने थयथयाट सुरू केला. तेव्हाच्या त्या सगळ्या




दक्षिण आफ्रिकेतील वर्णभेदाचा शेवट करण्यासाठी प्रदीर्घ कारावास भोगलेले, तरीही दुर्दम्य ध्येयनिष्ठा राखणारे. साऱ्या मानवजातीसाठी प्रकाशाची वाट दाखवणारे. इतिहासाच्या अर्धशतकाच्या पानावर आपली अमिट मुद्रा उमटवणाऱ्या महामानवाचे प्रेरणादायी चरित्र...

मंडेला

नेल्सन मंडेला यांचे चरित्र

डॉ. सदानंद बोरसे

आवृत्ती तिसरी । किंमत : ₹ २००/- । (ट.ख. ₹ ५०)

घटनाचक्रावर लोणी यांनी केलेले भाष्य मुळातून वाचण्यासारखे आहे.

आज पाकिस्तानची अवस्था दिवाळखोरीची आहे. भारताने ज्या कारणांसाठी पाकिस्तानबरोबर सहकार्य करायला नकार दिला आहे, त्या कारणांना दूर करायला पाकिस्तान तयार होत नाही. आजही पाकिस्तान दहशतवाद्यांचे अड्डे बंद करत नाही.

काश्मीरमध्ये दहशतवाद्यांना घुसवायचा प्रयत्नही थांबवण्यात आलेला नाही. तेव्हा पाकिस्तानचा नेमका अर्थ काय ते आपल्याला कळून चुकते. याचे नेमके कारण लिहिताना लोणी लिहितात, ‘भारत आणि पाकिस्तान यांच्या संबंधात सुधारणा न होण्याचे कारण मुख्य कारण पाकिस्तानच्या मानसिकतेत आहे. द्विराष्ट्र सिद्धान्तापासून सुरू झालेला पाकिस्तानचा प्रवास अजूनही त्याच सिद्धान्तात अडकला आहे.’ या पुस्तकात कारगिल युद्ध आहे, पाकिस्तानातल्या दहशतवादी संघटना यांची माहिती आहे. बलुचिस्तानची स्वातंत्र्य-उर्मी आहे.

पाकिस्तानचे अभ्यासक स्टीफन कोहेन यांचे एक चपखल वाक्य लोणी यांनी दिले आहे. ते असे, ‘एखादा गुंड समोरच्या डोक्याला पिस्तूल लावून खंडणी उकळतो, तसेच पाकिस्तानही आपल्या मित्र देशांबाबत करतो; परंतु तो समोरच्या डोक्याला नाही, तर स्वत:च्या डोक्यावर पिस्तूल ठेवतो!.’ अशा बहुतेक सर्व अंगांनी पुस्तक परिपूर्ण कसे होईल हे श्रीधर लोणी यांनी पाहिले आहे. पाकिस्तानविषयक संदर्भमूल्य असणारे इंग्रजी साहित्य आपल्याकडे उपलब्ध आहे. भारतीय आणि पाकिस्तानी लेखकांनीही लिहिलेली अनेक पुस्तके आहेत; पण मराठीत कमी आहेत. ती उणीव लोणी यांनी भरून काढली आहे.

***अरविंद व्यं. गोखले***

(*महाराष्ट्र टाइम्स, रविवार पुरवणी,* २ मार्च २०२५मधून साभार)


‘निसर्गातील संतुलन राखलं गेलं पाहिजे... खनिज, वनस्पती, प्राणी, माणूस... सर्वांमध्ये!’ हे मत मांडणारे रिचर्ड बेकर. वृक्षांचे संगोपन, संवर्धन आणि संरक्षण यांसाठी आपले संपूर्ण आयुष्य खर्चणाऱ्या या पर्यावरणरक्षणाची प्रेरणादायी चरितकहाणी.

अवघा देहचि वृक्ष जाहला...

वीणा गवाणकर



आवृत्ती चौथी । किंमत : ₹ २८०/- । (ट. ख. ₹ ५०)

## 'राजहंसी' विविधा



बाईच्या संघर्षमय जगण्याचं चित्रण मराठी कादंबरीला नवं नाही.
पण बायकांचा समूह मात्र क्वचितच कोणी रंगवला...
एका लहानशा खेड्यातला बायकांचा समूह ओघवत्या
भाषेत नि चित्रमय शैलीत रंगवणारी कादंबरी...

**बाय गं...** सामान्य स्त्रीचे सामान्य जनजीवन

विद्या पोळ - जगताप

आवृत्ती दुसरी । किंमत : ₹ ५००/- । (ट.ख. ₹ ५०)

चीन जितका आधुनिक, तितकाच ऐतिहासिकही.
आजही भारताबरोबरचा संघर्ष असेल वा अमेरिकेशी स्पर्धा-
चिनी सत्ताधीश आपली धोरणं ठरवताना इतिहासात
दडलेल्या सूत्रांचा आधार घेत असतात. हे चकित
करणारं विलक्षण चिनी प्रारूप समजावून देणारं-

**मेड इन चायना**

गिरीश कुबेर




आवृत्ती दुसरी । किंमत : ₹ ४५०/- । (ट.ख. ₹ ५०)




अनेक प्रकारे उपयुक्त ठरणारी वीज सामान्य माणसाच्या
दैनंदिन आयुष्यात खेळवणाऱ्या - आपले अवघे आयुष्य
विद्युतविज्ञानात झोकून देणाऱ्या -
मनस्वी वैज्ञानिकाच्या विलक्षण आयुष्याचा वेध!

**निकोला टेस्ला**
रोजच्या आयुष्यात वीज खेळवणारा वैज्ञानिक

सुधीर फाकटकर

किंमत : ₹ २७०/- । (ट.ख. ₹ ५०)

# राजहंसी पार

## काय घडलं ‘राजहंसी’ नगरीत?

### बाय गं : द्वितीय आवृत्ती प्रकाशन सोहळा



डावीकडून संदीप खरे, विद्या पोळ - जगताप, दिलीप माजगावकर,
अभिराम भडकमकर, वंदना बोकील-कुलकर्णी

राजहंस प्रकाशनाचे दिलीप माजगावकर यांच्या हस्ते आणि प्रसिद्ध कवी संदीप खरे, लेखक व नाटककार अभिराम भडकमकर आणि कादंबरीच्या संपादक डॉ. वंदना बोकील-कुलकर्णी या मान्यवरांच्या उपस्थितीत ‘बाय गं’ या कादंबरीच्या द्वितीय आवृत्ती प्रकाशन सोहळा पुण्यातील जवाहरलाल नेहरू सांस्कृतिक केंद्र येथे नुकताच पार पडला. ‘अवघ्या दहा महिन्यांत एवढ्या मोठ्या (जवळपास साडेतीनशे पानांच्या) कादंबरीची द्वितीय आवृत्ती येणं म्हणजे लेखकासाठी खरोखरच आनंदाची बाब आहे. साहित्यात किंवा कलेत ‘जनरल’ असं काहीच नसतं समूहात असूनही प्रत्येक व्यक्ती खास असते याचा प्रत्यय या कादंबरीतील प्रत्येक व्यक्तिरेखाच्या बाबतीत येतो.’ असे मत अभिराम भडकमकर यांनी व्यक्त केले. ‘सर्वसामान्य स्त्रीचं समूहातील जगणं चित्रित करणारी ही कादंबरी आहे. बाईचा संघर्ष चित्रित करणं हे मराठी कादंबरीला नवीन नाही; मात्र एखाद्या बायकांच्या समूहाचं चित्रण मात्र

दुर्मीळ आहे, हे या कादंबरीच्या रूपानं वाचकांसमोर आलं आहे.' असं सांगत कादंबरीच्या संपादनप्रक्रियेचा प्रवास वंदना बोकील कुलकर्णी यांनी उलगडला. कार्यक्रमाच्या उत्तरार्धात कवी संदीप खरे व विद्या पोळ- जगताप यांनी सादर केलेल्या 'बाईपणाच्या कवितां'ना रसिक प्रेक्षकांची दाद लाभली.

कार्यक्रमासाठी राजहंसचे डॉ. सदानंद बोरसे, रेखा माजगावकर तसेच विजय कुलकर्णी (मा. आयुक्त अहमदनगर), संगीता राजापूरकर (भूसंपादन अधिकारी पुणे), संजय असवले (भूसंपादन अधिकारी, सातारा), अंजली ढमाळ (उपसंचालक, मराठी भाषा विभाग), पत्रकार, सामाजिक क्षेत्रातील मान्यवर बहुसंख्येनं उपस्थित होते. सविता कारंजकर यांच्या नेटक्या, अभ्यासपूर्ण सूत्रसंचालनानं कार्यक्रमाची उंची वाढवली.

❖

## ६४ घरांच्या गोष्टी : प्रकाशन सोहळा




डावीकडून सौ. व श्री. कुंटे, गिरीश कुबेर, श्रीमती सुनंदा अभ्यंकर आणि सौ. गोखले

द्रोणाचार्य पुरस्कार विजेते रघुनंदन गोखले यांच्या '६४ घरांच्या गोष्टी' या पुस्तकाचे प्रकाशन पुण्यातील मोरेश्वर सभागृहात आयोजित करण्यात आलेल्या खास समारंभात करण्यात आले.

प्रकाशन समारंभ श्री. व सौ. कुंटे (अभिजित आणि मृणालिनीचे पालक), श्री. व सौ. गोखले (जयंत आणि चंद्रशेखर यांचे पालक) आणि श्रीमती सुनंदा अभ्यंकर (अनुपमा गोखले यांच्या मातोश्री) यांच्या हस्ते करण्यात आले.

याप्रसंगी लोकसत्ताचे संपादक गिरीश कुबेर अतिथी म्हणून उपस्थित होते. तसेच पराग करंदीकर (संपादक, महाराष्ट्र टाइम्स), सुरेंद्र पाटसकर (सहयोगी संपादक, सकाळ), डॉ. सदानंद बोरसे (संपादक, राजहंस प्रकाशन) आदी मान्यवरांचीही उपस्थिती लाभली.

प्रख्यात नाट्यकर्मी अतुल पेठे यांनी पुस्तकातील काही उतारे वाचून प्रेक्षकांच्या टाळ्या घेतल्या तर शिवछत्रपती पुरस्कार विजेते जयंत गोखले यांनी आपले गुरू रघुनंदन यांच्या पुस्तकावर केलेले काव्य वाचून दाखवले.

कुबेर यांनी पुस्तकाची आणि विशेष करून पुस्तकात दडलेल्या अनेक गोष्टींची स्तुती केली. ते म्हणाले की, 'गोखले यांनी प्रशिक्षक असूनही थोडाही उपदेश केलेला नाही. जे काही सांगितले आहे ते कथा या स्वरूपात येते.' पुस्तकाला ग्रँडमास्टर अभिजित कुंटे याने प्रस्तावना लिहिली आहे.

❖

## एका यशस्वी युरोलॉजिस्टची वाटचाल : प्रकाशन सोहळा

'एका यशस्वी युरोलॉजिस्टची वाटचाल' या डॉ. शरद बापट यांच्या आत्मचरित्राचे प्रकाशन रविवारी, १६ मार्च २०२५च्या संध्याकाळी मुंबईत शिवाजी पार्क येथे अगदी घरगुती आणि प्रसन्न समारंभात पार पडले. या प्रसंगी



डावीकडून शिल्पा शिवलकर, डॉ. शरद बापट आणि तारा पंडित

डॉक्टरांचे स्नेही आणि कुटुंबीय अशी जवळची मंडळी उपस्थित होती. या प्रसंगी पुस्तकात उल्लेख झालेले 'रे मनवा भज रे रामनाम' हे भजन त्याच्या जुन्या मूळ चालीमध्ये डॉ. बापट यांच्या आवाजात ऐकायला मिळाले.

डॉ. बापट यांचे वडील दत्तात्रय बापट यांनी आपल्या आठवणी लिहिल्या होत्या, त्या डायरीतून एका उताऱ्याचे वाचन पुस्तकाच्या लेखिका शिल्पा शिवलकर यांनी या वेळी केले. बापट परिवाराचे जवळचे स्नेही अजय आठल्ये यांनी या निमित्ताने दादरकर मराठी साहित्यिकांच्या आठवणी जागवल्या.

डॉ. बापटांची स्वत:ची मराठी भाषा अतिशय सहज आणि विना भेसळीची आहे आणि याच शैलीचा चांगला संस्कार या पुस्तकाच्या भाषेवर झाला असल्याचे शिल्पा शिवलकर यांनी या वेळी सांगितले.

❖

त्यांना ज्ञानाची परमकोटीची ओढ. आपलं आयुष्य म्हणजे ईश्वरानं दिलेली देणगी आहे अशी भावना. त्यामुळेच जग, जगणं हे त्यांना शिळं वाटलं नाही. म्हातारपणाची अडचण वाटली नाही. मृत्यूचं भय वाटलं नाही. अशा ज्ञानोपासक स्त्रीशी अभ्यासक स्त्रीच्या गप्पा




ऐसपैस गप्पा : दुर्गाबाईंशी

प्रतिभा रानडे

आवृत्ती दहावी । किंमत : ₹ २८०/- । (ट.ख. ₹ ५०)




नवं बदलतं संगीत ज्यांना ना समजतं, ना रुचतं; त्यांना ते समजून घ्यायला हे पुस्तक मदत करील. ज्यांना हे संगीत पचलं आहे, त्यांना त्यातले आणखी बारकावे हे पुस्तक दाखवील.

नवे सूर अन् नवे तराणे

संगीत आजच्या काळातलं

डॉ. आशुतोष जावडेकर

किंमत : ₹ २००/- । (ट.ख. ₹ ५०)

# वाचकांच्या मनातलं

*वाचकांचा प्रतिसाद हाच लेखकाचा खरा पुरस्कार! हा प्रतिसाद मित्रांना कळवा, तसेच आम्हांलाही कळवा; म्हणजे तो आम्ही लेखकांपर्यंत पोहोचवू. प्रकाशक-लेखक-वाचक यांच्यात विचारांची देवघेव करण्यासाठी.*

## मेड इन चायना

'मेड इन चायना' वाचले. भयंकरच आवडले. चीनची इतकी सर्वांगाने ओळख करून देणारे पुस्तक वाचल्याचा आनंद झाला. माओ-डेंग-जिंताओ-जिनपिंग यांची साम्यवादी कम्युनिस्ट भांडवलशाही विचारसरणी आपण कधीच समजून घेतली नाही. नुसती त्यांच्या नावाने बोटे मोडत राहिलो. चीनच्या प्रगतीच्या अफाट वेगाला वाढ म्हणावे की सूज हा मुद्दा वेगळा. या वाढीत विसंगती, विरोधाभास ठायीठायी भरलेले आहेत. हजारो निष्पाप लोकांचा हकनाक बळी घेऊन एका हुकूमशाही यंत्रणेच्या जोरावर ही प्रगती साधलेली आहे. या प्रगतीचे रूप ऊर दडपून टाकणारे आणि जगाला व्यापूनही पुरून उरणारे असले तरी चीनला अमेरिकेच्या तोडीस तोड, कुठे तर अमेरिकेपेक्षाही बळकट करणारे आहे. चीनला महासत्तेकडे नेणारी ही वाटचाल कशी झाली याबाबत सर्वसामान्य मराठी वाचक बव्हंशी अनभिज्ञच आहे. तिबेट आणि भारत-चीन युद्धाच्या अभिनिवेशी चर्चेपलीकडे त्याची मजल फारशी जात नाही. त्यातले जागतिक भू-राजकीय आणि अर्थकारणाचे कंगोरे समजून घेणे किती गरजेचे आहे, हे या पुस्तकावाटे अधोरेखित होते. आपल्याला तर पुष्कळच पल्ला गाठायचा आहे. पण रोगाकडे दुर्लक्ष करणे हा आपला रोगमुक्त होण्याचा उपाय! चीनही भारतासारखा भूगोलाने बांधला गेला आहे. चीनमध्येही भारतासारखे तत्त्ववेत्ते खूप झाले. पण मानसिक जडणघडणीत इतका आश्चर्यकारक फरक आहे. रेनमिन्बी हे चलन तर आपल्यासाठी 'सावध ऐका पुढल्या हाका' आहे. डोळे उघडे ठेवून पाहिले तर डोळ्यांत अंजन घालणारे असे वास्तवाचे भान आणून देणारे, मराठी पुस्तक आहे.

पुस्तकासाठी आपले हार्दिक अभिनंदन.

***डॉ. अनुराग लव्हेकर***, बंगळुरू

## निकोला टेस्ला

'मराठी दिन' आणि 'राष्ट्रीय विज्ञान दिन' या दोन्हींचे औचित्य साधून एक सुंदर पुस्तक वाचण्याचा योग आला. सुधीर फाकटकर लिखित 'निकोला टेस्ला'. एक हाडाचे वैज्ञानिक आणि संशोधक. सुधीरसरांना मनापासून धन्यवाद - इतका अमूल्य साठा वाचकांसमोर तोदेखील मराठी भाषेत प्रस्तुत केल्याबद्दल. खूप गहन संकलन आणि अथक वाचनाने हे शक्य झाले आहे. वाचनाला आणि खरे म्हणजे ज्ञानाला भाषेची किंवा कोणत्याही जातीची सीमा नसते आणि सर्वांसाठी ते अत्यंत उपयोगी असते. विज्ञानातील टेस्ला युनिट आणि टेस्ला कॉईल किती महत्त्वाचे आहे याची मॅग्नेटिक फील्डमधील आणि अर्थात physics शिकणाऱ्या सर्वांना नक्कीच कल्पना आहे. पण त्यामागील जडणघडण आणि अथक परिश्रम समजणे अत्यंत गरजेचे आहे. त्यासाठी एकदा जरूर वाचा- निकोला टेस्ला.

***डॉ. वसुधा भाटवडेकर***, पणजी (गोवा)

---

## देहभान

मी सध्या नोकरीसाठी रायपूर, छत्तीसगढ येथे राहते. आपले पॉडकास्ट मी नेहमी बघते. आपल्या पुस्तकाबद्दल ऊर्मिला निंबाळकर यांच्या पॉडकास्टमधून माहिती मिळाली. दोन दिवसांपूर्वी कामानिमित्त पुणे येथे येणे झाले. तेव्हा वेळात वेळ काढून बुकगंगा गाठली आणि देहभान पुस्तक विकत घेतले. काल परतीच्या प्रवासात रेल्वेमध्ये सर्व पुस्तक वाचून काढले. Thank u so much for bringing such valuable content in simplest language.

पुस्तकाची भाषा कळायला खूप सोपी आहे. केस स्टडीजच्या माध्यमातून विषयाचे आकलन लवकर झाले. माझ्यासारख्या गावखेड्यातून आलेल्या मुलींना हे फार दिशादर्शक आहे. गावच्या इकोसिस्टीममधे या विषयावर चर्चा व्हायला आणखी एखादे दशक लागेल. पण आपल्यासारखे लोक हे विषय पुढे आणतायत, हे फार स्वागतार्ह आहे. हे पुस्तक गावातील मुली, महिला यांपर्यंत जास्तीत जास्त पोहोचले जावे. मी ज्या भागातून येते, तेथे माझ्या माहितीत साधी marriage councellingची सोयपण नाही, तेथे अशा नाजूक विचाराचा तर फार बाऊ आहे.

शिक्षणामुळे माझी social mobility झालीये, त्यामुळे मी अशा पुस्तकांपर्यंत पोहोचू शकले. पण गावाकडील बहिणी/मैत्रिणी या contentपासून सामाजिक आणि आर्थिक पातळीवर अजूनही फार लांब आहेत. शहरी भागांत बऱ्यापैकी awareness

वाढताना दिसतोय. पण गावखेड्यातल्या लोकांसाठी, जे councelling, therapy काही कारणांमुळे afford करू शकत नाहीत, त्यांच्यापर्यंत पोहोचण्याचा प्रयत्न व्हावा.लग्न जुळण्याच्या प्रक्रियेमध्ये असणाऱ्या सर्व मित्र-मैत्रिणींना गिफ्ट द्यायला हे बुक बेस्ट ऑप्शन आहे आणि मी ते नक्की गिफ्ट करणार आहे.

***प्रांजली ठाकरे***, यवतमाळ

---

## नवे सूर अन् नवे तराणे

नुकतेच 'नवे सूर अन् नवे तराणे' हे पुस्तक वाचनात आले. पुस्तक वाचताना अतिशय ताजातवाना करणारा अनुभव होता. आशुतोष सरांची ओघवती व अभ्यासपूर्ण भाषाशैली जणू शेजारी बसून गप्पा व एक सुंदर चर्चाच ऐकायला मिळते अशी अनुभूती देते. नव्वदीच्या दशकातल्या आम्हा सर्व मुलांना आमच्या पुढच्या पिढीला ही 'आमच्या काळातील गाणी' हे सांगायला हे पुस्तक फार उपयोगी ठरणार आहे. २०११ साली दूरदृष्टी ठेवून प्रत्येक गाण्याचे, स्वरांचे, पार्श्वसंगीताचे, वाद्यांचे, गायकीचे बारकाव्यांसाहित रसग्रहण करणे व तेही इतक्या लाघवी पद्धतीने. फारच मज्जा आली. सरांशी फोनवर बोलणे, त्यांचा अकर्मण्य भाव व त्यांचे पुढील सुरू झालेले सांगीतिक विचार हा सुखद अनुभव होता. फार मजा आली. आम्हा सर्व वाचकांना हा आनंद देण्यासाठी मन:पूर्वक आभार.

***ईश्वरी सुभाष दसक्कर***, नाशिक


**मुखपृष्ठ, मुखपृष्ठाच्या व मलपृष्ठाच्या आतील पानांवरील पुस्तकांविषयी**

- सोबत सांजवेळची — किंमत : ₹ ४००/-
  डॉ. प्रियदर्शिनी कुलकर्णी । अनु. पद्मजा मेहेंदळे
- शोध बदलत्या पृथ्वीचा — किंमत : ₹ ४००/-
  सुनीत पोतनीस
- छतं गळोत — किंमत : ₹ १६०/-
  श्रीधर देशपांडे
- त्यानंतर — किंमत : ₹ २८०/-
  श्रीपाद भालचंद्र जोशी

कधी न गळणारा

## ‘राजहंसी’ मोहोर

राजहंस प्रकाशनचे अव्वल लेखक,
त्यांची गाजणारी पुस्तकं आणि रसिक वाचक यांची थेट गाठ दर बुधवारी घालून देणारा

**श्रवणीय साप्ताहिक उपक्रम (ऑडिओ पॉडकास्ट)**

**१ मे २०२४पासून सुरू...**

आमच्या नवनवीन योजनांसाठी बघत राहा

**‘राजहंस ॲप’**

App Store — आयफोन आणि आयपॅडसाठी

Google Play — अँड्रॉइड फोन आणि टॅब्लेटसाठी

तुम्ही ‘राजहंस’ला असेही भेटू शकता

Website : www.rajhansprakashan.com



## राजहंस प्रकाशन

- १०२५ सदाशिव पेठ, नागनाथ पाराजवळ, पुणे ४११०३०. ✆ २४४६५०६३/२४४७३४५९.
  E-mail : rajhansprakashan1@gmail.com I Website : www.rajhansprakashan.com
- राजहंस पुस्तक पेठ, साई सरस्वती, शिक्षकनगर, गल्ली क्र. ७च्या सुरुवातीस, परमहंसनगर, वनाजजवळ, पौड रोड, पुणे ४११०३८. ✆ ९३२२६३०७०३.
- शॉप नं. २, सखारामकृपा अपार्टमेंट, अमर हिंद मंडळासमोर, गोखले रोड, दादर (प.), मुंबई ४०००२८. ✆ २४२२३९०१.
- नरेश सबजीवाले, गुलमोहर हॉलसमोर, खामला रोड, नागपूर ४४००२५. ✆ ९३७२२२५२०१.
- राजहंस ग्रंथघर, अनुप देशपांडे, १०, शून्य संकुल, सहजीवन कॉलनी, समर्थनगर, छत्रपती संभाजीनगर ४३१००१. ✆ ९०९६९४३३६९.
- पंकज क्षेमकल्याणी, २, तळमजला, गुरुपुष्य अपार्टमेंट, आकाशवाणी केंद्रामागे, आनंद नगर, (सावरकर नगर), गंगापूर रोड, नाशिक - ४२२०१३. ✆ ९४२२२५२२०८
- अक्षरदालन, निर्मलाय प्लाझा, कोळेकर तिकटी, कोल्हापूर ४१६०१२. ✆ २६४६४२४.
- डॉ. उमेश करंबेळकर, ३२५ मंगळवार पेठ, रघुकुल अपार्टमेंट, सातारा ४१५००२. ✆ २८२५१०.
- मुग्धा शेवाळकर, तळमजला, साईदत्त अपार्टमेंट, सितारा बजाज शोरूमजवळ, शांतीनगर, फोंडा, गोवा ४०३४०१. ✆ ७३९७४६९३९० / ८६०५८९१०१९
- नंदादीप सर्व्हिसेस, २३६/१ साखर पेठ, प्लॉट नं १, नारायण कॉम्प्लेक्स, विणकर बागेसमोर, सोलापूर - ४१३००५ ✆ ९८२२८०७७१५.

ही आहेत कवीची स्वगतं !
स्वत:ला पडणारे प्रश्न आणि
असण्या-नसण्यातल्या भीतीचं भिरभिरलेपण.
या आहेत जगण्यातल्या विरामचिन्हांच्या काव्यात्म
नोंदी अन् आटलेल्या मायेच्या स्मृती.
जगण्यातील शुष्कतेला ओल देणारा
हा प्रार्थनाशील सूर हृदयातून ऐकावा असा....



Registered RNI NO. MAHMAR / 2009 / 33647)
(Published on 15th of every month and posted on 20th of every month at S.P.COLLEGE PO, Pune)
Periodical post

'सळाळ आणि सळाळनंतर...',
'समांतर', 'मथितार्थ' व 'इत्यादि'
या कवितासंग्रहांनंतरचा श्री. भा. जोशी
यांचा हा पाचवा कवितासंग्रह
रसिकांच्या भेटीस येतोय....
समग्र समाजमन आणि
कालखंड यांच्या सोबतीनं केलेला
हा काव्यप्रवास वाचकांनाही
समृद्ध अनुभव देईल असा...

## त्यानंतर

## श्रीपाद भालचंद्र जोशी




प्रेषक : **राजहंस ग्रंथवेध, द्वारा राजहंस प्रकाशन,** १०२५ सदाशिव पेठ, नागनाथ पाराजवळ, पुणे ४११०३०. फोन - २४४७३४५९

**सदरचे मासिक 'राजहंस' प्रकाशनाच्या वतीने मुद्रक, प्रकाशक रेखा दिलीप माजगावकर यांनी रिच प्रिंट्स, २७२ नारायण पेठ, पुणे ४११०३० येथे छापून १०२५ सदाशिव पेठ, नागनाथ पाराजवळ, पुणे - ४११०३० येथे प्रसिद्ध केले. संपादक : डॉ. सदानंद बोरसे**